


दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २७ वा | गुरुवार, दि. १४ ऑगस्ट २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# घर एकच अन मतदार तब्बल 119, मतदार यादीतला मोठा घोळ समोर

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पत्रकार परिषद घेऊन महाराष्ट्रासह इतरही राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत मतचोरी झाल्याचा गंभीर आरोप केला. या आरोपानंतर आता निवडूक आयोगाला आरोपींचा पिंजऱ्यात उभं करण्यात आलंय.

देशभरात तसेच महाराष्ट्रातही याविरोधात काँग्रेसने आंदोलनं केली. राहुल गांधी यांनी हे आरोप करताना थेट पुरावेच सादर केले होते. दरम्यान, त्यांच्या आरोपांनंतर आता चंद्रपुरातून धक्कादायक असा प्रकार समोर आला आहे. येथे एकाच घरात तब्बल 119 मतदारांची नोंद सापडली आहे. काँग्रेसनेच हे प्रकरण बाहेर काढले असून अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

### एकाच घरात 119 मतदार, नेमके कसे?

मिळालेल्या माहितीनुसार चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्गुस या गावातून हा प्रकार समोर आला आहे. येथे एकाच घरात तब्बल 119 मतदारांची नोंद सापडली आहे. तसं पाहायचं झालं तर या घरात केवळ दोनच मतदार आहेत. त्यामुळे याच घरात 100 पेक्षा जास्त मतदारांची नोंद नेमकी कशी झाली? असा गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. घुग्गुस हे ग्रामपंचायत असलेले औद्योगिक गाव आहे. या गावात तसेच पंचक्रोशीत अनेक कंपन्यांचे कारखाने आहेत. याच गावात सचिन बांदुरकर यांचे 350 क्रमांकाचे घर आहे. राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत या घरातून तब्बल 119 मतदारांची नोंदणी झाली आहे.



### यादी तपासताच समोर आला घोळ :

या सर्वच 119 मतदारांचा घर क्रमांक हा 350 आहे. एका लहानशा घरात एवढ्या मतदारांची नोंद कशी काय करण्यात आली, हा मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. काँग्रेसच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी आयोगाच्या यादीनुसार तपासणी केली असता हा घोटाळा समोर आला. हा घोटाळा समोर येताच मोठी खळबळ उडाली आहे.

### सखोल चौकशी करण्याची काँग्रेसची मागणी

दरम्यान, एकाच घरात तब्बल 199 मतदारांची नोंद झालेले हे लोक कोण? या मतदारांची नोंदणी कुणी केली? मतदारांची नोंदणी करताना हा प्रकार अधिकाऱ्यांना समजला नाही का? की हे सर्वजण बोगस मतदार आहेत? असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित केले जात आहेत. विशेष म्हणजे हे प्रकरण समोर आल्यानंतर घरमालकही चकित झाला आहे. मला याबाबत काहीच कल्पना नव्हती, अशी प्रतिक्रिया घरमालकाने दिली आहे. दुसरीकडे हे प्रकरण समोर आल्यानंत तेथे काँग्रेसने आक्रमक पवित्रा धारण केला असून त्याची सखोल चौकशी करावी? अशी मागणी करण्यात आली आहे.

### निवडणूक आयोग काय करणार?

त्यामुळेच आता समोर आलेल्या या प्रकाराची निवडणूक आयोग नेमकी काय दखल घेणार? आयोगातर्फे याची चौकशी केली जाणार का? चौकशी झालीच तर नेमके काय सत्य बाहेर येणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

विकणे /भाड्याने देणे आहे

वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.

संपर्क : डी. बी. शिंदे

मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३

पत्ता: अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

# 'पोलीस बघून घेतील म्हणजे काय? तुम्हाला हल्ले घडवून आणायचेत का?

## जरांगे पाटील यांचा फडणवीसांना सवाल!

**जालना (कटूसत्य वृत्त):-** ओबीसीतून मराठा आरक्षण या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली येत्या 29 तारखेला मुंबईत मराठा समाजाचा भव्य मोर्चा धडकणार आहे. परंतु त्यापूर्वीच राज्यातील वातावरण तापल्याचे चित्र आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे लातूर दौऱ्यावर असताना त्यांना मुंबईतील मराठा मोर्चा संदर्भात माध्यमाने प्रश्न विचारला तेव्हा त्यांनी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न आहे, पोलीस तो बघून घेतील, असे उत्तर दिले होते. हाच धागा पकडत मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे.

'बघून घेतील म्हणजे काय? फडणवीस म्हणजे पोलीस आणि पोलीस म्हणजे फडणवीस हे समीकरण राज्यात आहे. तुम्ही काय आमच्यावर हल्ले करणार आहात का? असा सवाल करत फडणवीस साहेब आधी जे घडलं ते घडलं! आता जर माझ्या पोरांना धक्का लागला तर संपूर्ण राज्य कायमस्वरूपी बंद होईल, असा इशारा मनोज जरांगे यांनी परभणी येथे समाज बांधवांशी बोलताना दिला. आम्ही शांततेत मोर्चा घेऊन मुंबईत येणार आहोत, तुम्ही राज्याचे वातावरण खराब करण्याचा प्रयत्न करू नका.



मराठे आता थांबणार नाहीत, देवेंद्र फडणवीस षडयंत्र करत आहेत अशी लोकांमध्ये चर्चा होती. आधी मला ती खोटी वाटली परंतु पोलीस बघून घेतील या त्यांच्या इशाऱ्यानंतर ते सिद्ध होत आहे. माझं त्यांना हात जोडून सांगणं आहे, की गेल्यावेळी केला तसा प्रयोग किंवा प्रयत्न त्यांनी यावेळी करू नये. अन्यथा याचे गंभीर परिणाम होतील, महाराष्ट्र राज्य भविष्यात कायमस्वरूपी बंद होईल आणि दिल्लीतल्या मोदी सरकारलाही याचा त्रास सहन करावा लागेल, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

देवेंद्र फडणवीस यांनी गोव्यात ओबीसी अधिवेशनात सहभाग नोंदवत 'मी ओबीसी साठी लढणार' असे विधान केले. मग मराठा समाजासाठी कोण लढणार? दलित मुस्लिम समाजाने तुम्हाला मतदान केले नाही का? मराठ्यांनी तुम्हाला सत्तेत आणलं आणि तुम्ही ओबीसीसाठी लढणार. मराठा समाजाबद्दल देवेंद्र फडणवीस यांच्या मनात किती द्वेष आहे हे यातून सिद्ध झाल्याचे जरांगे पाटील म्हणाले.

फडणवीस यांनी गोव्यातील ओबीसी अधिवेशनात जाऊन त्यांच्या नेत्यांचे कान भरले. आंदोलनाच्या काळात राज्यात दंगल भडकवण्याचा त्यांचा डाव असल्याचा आरोप जरांगे यांनी पुन्हा केला. मी मॅनेज होत नाही म्हणून माझ्यावर फडणवीस हल्ला करतात, असा आरोप करताना 27 ऑगस्ट रोजी अंतरवाली सोडणार आहे. मराठ्यांना आव्हान आहे की, त्यांनी दिसेल त्या मार्गाने मुंबईत घुसायचे. यंदा माघार नाही आरक्षण घेऊ आणि ओबीसीतूनच घेऊ, असा दमही जरांगे पाटील यांनी यावेळी भरला.

# सिटूच्या वतीने टेरीफ कराच्या निषेधार्थ डोनाल्ड ट्रम्पचा पुतळा दहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी १ ऑगस्टपासून भारतातून आयात होणाऱ्या वस्तूंवर २५ टक्क्यांपर्यंत अतिरिक्त कर लादण्याचा निर्णय घेतला असून, त्यामुळे भारतीय उद्योग आणि शेती क्षेत्रावर गंभीर परिणाम होणार आहेत. व्यापार वाटाघाटी सुरू असतानाही अमेरिकेकडून सातत्याने धमक्या देण्यात येत आहेत.

रशियाकडून भारत तेल व शस्त्रास्त्रे विकत घेत असल्याने ती खरेदी थांबवण्याची धमकी ट्रम्प यांनी दिली आहे. अन्यथा, २७ ऑगस्टपासून आणखी २५ टक्के अतिरिक्त कर लावण्याची घोषणा करण्यात आली आहे. या कृतीतून अमेरिकन साम्राज्यवादाचा कुरूप चेहरा उघड झाला असून, भारताच्या सार्वभौमत्वावर व स्वतंत्र व्यापार धोरणांवर सरळ आक्रमण केले जात आहे. तसेच या टेरिफ करामुळे सोलापूर शहरातील मुख्य उत्पादन चादर व टॉवेल्स निर्यातीस बंदी असल्याने अडीचशे कोटी रुपयांची उलाढाल ठप्प झाली आहे.यामुळे हजारो कामगारांच्या रोजीरोटीचा प्रश्न गंभीर बनलेला आहे. टेरीफ कर हाणून पाडा अन्यथा रस्त्यावरची लढाई आणखी तीव्र करण्याचा इशारा ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांनी दिला.

बुधवार दि. १३ ऑगस्ट २०२५ रोजी सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्सच्या वतीने सिटूचे राज्य उपाध्यक्ष कॉ. युसुफ शेख (मेजर) यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषद पूनम गेट येथे टेरिफ कराच्या निषेधार्थ आक्रमक धरणे आंदोलन व अमेरिकन साम्राज्यवादाचा प्रमुख



डोनाल्ड ट्रम्प यांचा प्रतीकात्मक पुतळा दहन करण्यात आला. यावेळी कार्यकर्ते यांना आवरताना पोलिसांची तारांबळ उडाली.

सिटूचे राज्य महासचिव कॉ. एम.एच.शेख यांनी भूमिका मांडताना म्हणाले कि, भारत सरकारने अशा कारस्थानांना बळी पडू नये. नुकत्याच झालेल्या युरोपियन युनियन व युनायटेड किंगडमसोबतच्या 'सीईटीए'सारख्या करारांमध्ये झालेल्या तडजोडीमुळे शेती, दुग्ध व्यवसाय आणि औद्योगिक क्षेत्रावर संकट अधिक गडद झाले आहे. यामुळे ब्रिटन, युरोपियन युनियनसह साम्राज्यवादी देशांना फायदा होत असून, भारतीय शेतकरी व कामगार यांचे नुकसान होत आहे.

अशा पार्श्वभूमीवर, अमेरिकेसोबत सुरू असलेल्या मुक्त व्यापार कराराच्या वाटाघाटींमध्ये अमेरिकन अटींना मोदी सरकार बळी पडू नये. सरकारने अमेरिकेच्या दबावाखाली दहा वर्षांचा संरक्षण करार करण्याचा प्रयत्न त्वरित थांबवावा, अशीही भूमिका व्यक्त करण्यात आली आहे.

यावेळी कॉ. नलिनीताई कलबुर्गी, नसीमा शेख, ॲड अनिल वासम, दत्ता चव्हाण, शेवंताताई देशमुख, सुनंदा बल्ला, व्यंकटेश कोंगारी, रंगप्पा मरेड्डी, दाउद शेख, विल्यम ससाणे, लिंगव्वा सोलापूर, नरेश दुगाणे, शंकुतला पाणीभाते, दीपक निकंबे, बापू साबळे, हसन शेख,मल्लेशम कारमपुरी, विजय हरसुरे, बाळकृष्ण मल्याळ, रफिक काझी, मुरलीधर सुंचू, विक्रम कलबुर्गी, अकिल शेख आदींसह लढाऊ कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# हर घर तिरंगा मोहिम;

## पंढरपूरात भव्य तिरंगा रॅली संपन्न

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** 'हर घर तिरंगा' मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी पंढरपूर नगरपरिषदेच्यावतीने आज भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. तिर्रगा रॅलीस शहरातील विविध विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या 78 व्या वर्धापनदिना निमित्त पंढरपूर नगरपरिषदेच्या वतीने लोकांमध्ये राष्ट्रध्वजाबद्दल जागरूकता निर्माण करणे, देशभक्तीची भावना जागृत करणे आणि राष्ट्रध्वजासोबत प्रत्येक नागरिकाचा वैयक्तिक बंध



जोडणे, या उदात्त उद्देशाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सदर रॅलीमध्ये लोकमान्य विद्यालय, गौतम विद्यालय, कवठेकर प्रशाला, द.ह कवठेकर प्रशाला, अरिहंत विद्यालय, आपटे उपलप प्रशाला, ईश्वर अम्मा प्रशाला, यशवंत विद्यालय, विवेक वर्धिनी विद्यालय, औदुंबर पाटील विद्यालय आदी शाळांचे विद्यार्थी व शिक्षक यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.

भारत माता की जय, वंदेमातरम, वंदेमातरम, भारतीय स्वातंत्र्याचा विजय असो, घर-घर तिरंगा हर घर तिरंगा" च्या जयघोषाने शहरातील वातावरण देशभक्तीमय, देशभक्तीने मंत्रमुग्ध झाले होते.प्रत्येक विद्यार्थ्याच्या हाथी तिरंगा झेंडा फडकवीत सदर रॅली शिस्तबध्द रीतीने पार पडली. सदर रॅली शहरातील प्रदक्षिणा मार्गावरून संचलन करीत जिजामाता उद्यान येथे समाप्त झाली. रॅलीमध्ये नगरपरिषद अधिकारी, कर्मचारी व पंढरपूर शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होत.

# सोलापूरात खंडपीठ होण्यासाठी मोठा लढा उभारणार

## १५ ऑगस्ट रोजी पालकमंत्री गोरे यांना निवेदन देणार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ सोलापूर येथे स्थापन व्हावे,यासाठी शहरातील सामाजिक संघटनांनी एकत्र येऊन शनिवारी मुंबई उच्च न्यायालय सोलापूर खंडपीठ कृती स्थापन केली. या कृती समितीतर्फे येत्या १५ ऑगस्ट रोजी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेऊन निवेदन देण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यातील मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ सोलापुरात व्हावे या मागणीसाठी शनिवारी बैठक झाली.

१५ ऑगस्ट रोजी पालकमंत्र्यांना निवेदन देणार. सर्व लोकप्रतिनीधींना खंडपीठ व्हावे, यासाठी निवेदन देण्यात येणार आहे. खंडपीठासाठी भविष्यात मोठा लढा उभा करण्याचा निर्णय घेतला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाचे सोलापूर येथे खंडपीठ स्थापन व्हावे,यासाठी वेक अप सोलापूर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मिलिंद भोसले यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय विश्रामगृहामध्ये शनिवारी सायंकाळी वकील मंडळी, वेक अप सोलापूर फाउंडेशन, सोलापूर विकास मंच, गिरिकर्णिका फाउंडेशन या संघटनांचे व विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी यांची बैठक झाली. यात कृती समिती गठित करण्यात आली. या बैठकीत कोल्हापूर येथे जे खंडपीठ स्थापन करण्यात आले, त्याला विरोध करण्यात आला. तसेच सोलापुरात खंडपीठ व्हावे यासाठी सोलापूर शेजारील धाराशिव, लातूर जिल्ह्याने खंडपीठासाठी पाठिंबा दिला आहे. तसेच सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुका व शहर स्तरावरील सर्व वकिलांची एक बैठक मंगळवारी घेण्यात येणार आहे.यावेळी ॲड. खतीब वकील, वकील बारचे माजी अध्यक्ष ॲड. शिवशंकर घोडके, विकास मंचचे योगीन गुर्जर, ॲड. राजन दीक्षित, ॲड. केशव इंगळे, दैनिक कटूसत्य चे संपादक पांडुरंग सुरवसे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी विजय जाधव, रूपेश इंगळे, आनंद पाटील, राजेश देशपांडे,आप्पा कन्नुरकर, गणेश शिलेदार हजर होते.









संपादकीय

# धनखड यांचा ठावठिकाणा

देशात सध्या सगळीकडेच काही ना काही आक्रित घडताना दिसत आहे. निवडणुकीतील मतदानाचे नवनवीन घोळ रोजच उघड केले जात असून फटाक्यांची माळ लागावी तशी प्रकरणे समोर येत आहेत. हे सगळे एकीकडे घडत असतानाच दुसरीकडे आणखीनच एक गंभीर मुद्दा विरोधी पक्षांच्या काही नेत्यांनी उपस्थित केला आहे. देशाचे माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी राजीनामा दिल्यापासून त्यांचा ठावठिकाणाच लागेनासा झाला आहे. ते अचानक बेपत्ता झाल्याची तक्रार शिवसेनेचे नेते संजय राऊत आणि त्याआधी राज्यसभेचे खासदार आणि ज्येष्ठ विधीज्ञ कपिल सिब्बल यांनी केली आहे.

सिब्बल यांनी तर जगदीप धनखड यांच्या ठावठिकाण्याविषयी शंका व्यक्त करणारे जाहीर निवेदन केले आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, जगदीप धनखड यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न मी गेल्या अनेक दिवसांपासून करीत आहे; पण त्यांच्याशी माझा संपर्क होऊ शकलेला नाही. एकदा मी केलेला फोन उचलला गेला; पण तो फोन धनखड यांच्याऐवजी त्यांच्या सुरक्षारक्षकाने उचलला आणि त्याने, 'साब आराम कर रहे है' असे उत्तर देऊन फोन ठेवून दिला. नंतर पुन्हा त्याच फोनवर संपर्क साधला असता फोनच उचलला गेला नाही. त्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेविषयी शंका निर्माण झाली आहे. अशीच शंका शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत जाहीरपणे बोलून दाखवली. धनखड आहेत का त्यांना गायब केले गेले आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. या ज्येष्ठ नेत्यांनी व्यक्त केलेली शंका गंभीरच आहे. जो माणूस देशाच्या दुर्सया क्रमांकाच्या घटनात्मक पदावर अगदी परवापरवापर्यंत कार्यरत होता त्याच्या ठावठिकाण्याविषयी विरोधी पक्षाच्या नेत्यांनी प्रश्न उपस्थित करणे किंवा आशंका व्यक्त करणे हे निश्चितच गंभीर आहे. धनखड यांनी अचानक राजीनामा का दिला, हे गूढ अजून उकललेले नाही. त्यांच्या राजीनाम्याविषयी विविध वाहिन्यांनी आणि राजकीय तज्ज्ञांनी वेगवेगळ्या घटनांचे संदर्भ देत आपले आकलन मांडले; पण त्यातून नेमक्या वस्तुस्थितीचा उलगडा होऊ शकलेला नाही.

धनखड यांनी आपल्या राजीनामा पत्रात प्रकृतीच्या कारणाचा दाखला दिला आहे, पण ज्या दिवशी त्यांनी राजीनामा दिल्याची बातमी आली त्या दिवशी ते दिवसभर विविध बैठकांमध्ये व्यस्त होते त्यामुळे त्यांच्या प्रकृतीचे कारण तितकेसे खरे नाही हे एव्हाना सगळ्यांनाच समजून चुकले आहे. आपल्या राजीनाम्याविषयी खुद्द धनखड पत्रकारांशी बोलतील किंवा निदान सोशल मीडियावरून तरी व्यक्त होतील अशा प्रतीक्षेत अनेक जण होते, पण गेल्या अनेक दिवसांत ना ते सोशल मीडियावर व्यक्त झाले, ना त्यांनी एखादी प्रेस कॉन्फरन्स घेतली. मग धनखड हे अचानक असे मौनात का गेले यावरून शंका उपस्थित केल्या जाऊ लागल्या. ज्या दिवशी त्यांनी राजीनामा दिला त्या दिवशी त्यांचे घर आणि कार्यालय सील केले गेले असल्याच्या बातम्या काही ठिकाणी प्रसारित झाल्या होत्या.

ही कारवाई कोणाच्या सांगण्यावरून कोणी केली त्याचाही उलगडा झाला नाही, त्यानंतर धनखड यांचा राजीनामा हा विषय बाजूला टाकला गेला आणि दूरचित्रवाणी वाहिन्यांवरूनही तो विषय गायब झाला. सरकार किंवा दूरचित्रवाणी वाहिन्यांकडून धनखड यांच्या राजीनाम्याला अजिबातच महत्त्व दिले गेले नाही ही बाब एक वेळ समजून घेता येईल, पण धनखड यांचे सार्वजनिक दर्शनच बंद होणे किंवा त्यांचा ठावठिकाणाच लागेनासा होणे हे विचित्रच लक्षण मानले पाहिजे. माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचे नुकतेच निधन झाले, त्यांच्या निधनाच्या आधी त्यांनी एक व्हिडिओ तयार केला होता आणि तो नंतर सोशल मीडियावर प्रसारित झाला. त्यात ते आपल्याला सरकारकडून खोटेपणाने गुंतवले जात असल्याच्या तक्रारी करताना दिसत आहेत. पण निदान सत्यपाल मलिक यांचा रुग्णालयातला व्हिडिओ तरी बाहेर आला.

मात्र, जगदीप धनखड यांचे एकही निवेदन किंवा दर्शन अद्यापपर्यंत होऊ शकलेले नाही. मुळात ते दिल्लीत आहेत किंवा कसे, ते त्यांच्या अधिकृत शासकीय निवासस्थानीच आहेत, की त्यांना अन्यत्र शिफ्ट केले गेले आहे याचीही कोणतीच माहिती जाहीर झालेली नाही. त्याविषयी देशवासीयांना आणि देशातील प्रमुख राजकीय पक्षांच्या नेत्यांना चिंता वाटणे स्वाभाविक आहे. धनखड यांच्या खुशालीविषयी जाहीरपणे शंका व्यक्त केली गेली असताना आता त्यांची ख्यालीखुशाली सरकारकडूनच जाहीर होणे अपेक्षित आहे. त्यामुळे सरकारने तातडीने त्याविषयीचे निवेदन जाहीर करून लोकांच्या मनातील शंका दूर करावी किंवा खुद्द धनखड यांनी निदान सोशल मीडियामार्फत तरी प्रकट होऊन आपल्याबाबतची माहिती द्यावी अशी अपेक्षा कोणीही व्यक्त करील. उपराष्ट्रपती पदावरचा माणूस अचानक असा सार्वजनिक जीवनातून गायब होणे हे संपूर्ण देशासाठी आणि देशातील सध्याच्या एकूणच व्यवस्थेविषयी शंका निर्माण करणारे आहे, ही शंका दूर करण्यासाठी सरकारनेच पुढाकार घेणे गरजेचे आहे.

प्रबोधन

# धन्य देश माझा । धन्य लोकशाही राज्यघटना दुरुस्त करा

'राजा' हा भारतीय संस्कृतीने विष्णूचा अवतार मानला आहे. भारतीय संस्कृती या नावाची जीवनपद्धती ज्या मनूच्या विचारांवर आधारलेली आहे, तिच्यात तसं पहिल्यांदा म्हटलं गेलं. मग राजा हा शिरसावंद्य झाला म्हणजे डोक्यावर चढून बसला आणि मिरी वाटू लागला. मनुस्मृतीने राजाज्ञा ही देवाज्ञा मानावी, असं म्हटल्याने किती निरपराधींना अल्पवयीन, अल्पबुद्धीच्या, अननुभवी, व्यसनी, विकृत, चंचल, लहरी स्वभावाच्या, हलक्या कानांच्या, मदोन्मत्त, राजाज्ञांमुळे 'देवाज्ञा झाली' असेल, ते सांगणे महाकठीण आहे! मनूने समाजाला वेसण घालण्यासाठी राजा कोणत्याही वयाचा असला तरी, त्याची आज्ञा समाजाने शिरोधार्य मानावी, असा एक मूर्खपणाचा नियम लिहून ठेवला आहे. लढाया, खून, विषप्रयोग हे राजांच्या पाचवीला पुजलेले प्रकार असल्याने थोरले राजे निधन पावले, की त्यांचा दोन वर्ष वयाचा मुलगाही राजा व्हायचा आणि तमाम जनता ज्याला आपलं शी-शूसुद्धा कळत नाही, त्याच्या आज्ञेत

राही. म्हणजे थोरल्या राजाने जो शिस्तीचा धडा घालून दिला असेल, तो कोलमडून पडायचा आणि धाकट्या राजांच्या बाळलीलांना राज्यकारभार म्हणण्याची अनर्थकारी वेळ मनुस्मृतीमुळे भल्याभल्यांवर गुदरायची! अशा वेळी ते भले बिचारे राजा कालस्य कारणम अर्थात 'चांगली किंवा वाईट परिस्थिती निर्माण होण्याचं कारण राजा असतो,' असं म्हणून कपाळ ठोकत बसत. भारताच्या सामाजिक अवनतीचं मूळ असं हे मनुमहर्षीच्या मूर्ख विचारात सापडतं.

आजची स्वतंत्र भारताची राज्यघटना काही मनूच्या विचारांवर आधारलेली नाही. तरीही आजचे धन्य ते आमदार, खासदार जर भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार अस्तित्वात येत असतील, तर आपली राज्यघटना ही नवी मनुस्मृतीच आहे, असं चिकित्सक माणसाला वाटणे स्वाभाविक आहे. आपल्या थोर घटनेनुसार किती बोके संन्यासी संसदेत घुसले ते पाहा. गरीब शेतकऱ्यांच्या खुनांनी हात बरबटलेले किती राक्षसी वृत्तीचे नीच जमीनदार खासदार-आमदार झालेत ते लक्षात घ्या. किती बलात्कारी, करून सवरून शुभ्र झब्ब्या-पायजम्यात आपली दुष्कृत्यं लपवून मग्रूर वृत्तीने पवित्र संसदेच्या- विधिमंडळाच्या पायऱ्या लीलया ओलांडून आपले रक्तमाखले पाय सभागृहात नेताहेत, ते पाहा. जनता म्हणजे काय? लोकप्रतिनिधीची व्याख्या काय? समाजात घडणाऱ्या घटनांचे अन्वय कसे तपासायचे असतात? कशाकशाची गंधवार्ता नसलेली श्रीमंतांची, राजघराण्यातील, राजकारणी बापांची अर्धवट बुद्धीची, धड मिसरूडही न फुटलेली मुलं जर आमदारकी आणि खासदारकीची पदं मिळवून अधिकार ग्रहण करीत असतील, तर राज्यघटनेत काही तरी मोठी चूक राहिली आहे, असं म्हणणं भाग पडतं.

असे लोकशाहीच्या चुकीमुळे मोठे झालेले, आपला अधिकार गाजवण्यासाठी प्रशासकीय सेवेत ज्यांनी 'काळ्याचे पांढरे' केलेल्यांना जर कायदा शिकवू लागले, शहाणपण नसताना उपदेश करू लागले, नेकीने वागणाऱ्या अधिकाऱ्याचा उपमर्द करून, त्यांच्या बदल्या करून, त्यांच्यावर दंडात्मक कारवाया करू लागले, तर सामाजिक समतोल ढळायला वेळ लागणार नाही. आज भारतभर हेच घडतं आहे. हे घडणं जर आमच्या राज्यघटनेच्या आधारे होत असेल, तर घटनादुरुस्ती होणं गरजेचं आहे, हे गंभीरपणे लक्षात घेतलं पाहिजे.

मनूचा काळ हा सुधारणापूर्व काळ होता. आज आपण सुधारणोत्तर काळात आहोत. चुकते कुठे? हे एकदा कळलं, की ताबडतोब दुरुस्तीचं काम हातात घेतलं पाहिजे. तरच पुढचा प्रवास शक्य आहे. जे चाललं आहे ते ठीक आहे, असं मानणं हा गाढवपणा. शहाण्यांना तो शोभत नाही. कारण-

अडाणी देशाला । मिळाली लोकशाही
लबाडांची झाली । चंगळचि ॥१
सिंहस्थपर्वणी । आली भटा घरी
लोकशाही बरी । तशी धूर्ता ॥ २
आंबटचिंबट । धन्य आमदार
आणि खासदार । अपक्व ते ।। ३
मग्रुरीची भाषा । फायद्याची हाव
व्यर्थ बडेजाव । नेत्याअंगी ॥४
जुने राजे गेले । छळून पिळून
टाकती गिळून । नवे 'राजे' ॥५
कंगाल जनता । भयभीत होते
दैवा दोष देते। मूर्खपणे ।। ६
राज्यघटनेने । नेते हे निर्मिले
कलंकित झाले । तिचे हात ॥ ७
चोर, बलात्कारी। खुनी, बदमाश
झालेत झकास । राज्यकर्ते ॥ ८
परिवर्तनाची । येथे न शक्यता
वांझ साऱ्या चिंता । भविष्याच्या ।। ९
धन्य देश माझा । धन्य लोकशाही
कुत्रा पीठ खाई। दळे अंध ।। १०



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

प्रबोधन

# स्वातंत्र्याचे गाणे । जोरात वाजले

स्वातंत्र्याशिवाय जीवन अर्थपूर्ण होऊ शकत नाही. गोठ्यात बांधलेल्या जनावराला जसं स्वातंत्र्य नसतं तसंच आफ्रिकेच्या जंगलात मुक्तसंचार करणाऱ्या जनावरालाही स्वातंत्र्य नसतं. कारण त्यांच्या स्वातंत्र्यावर कधी जीव घेणारा हल्ला होईल, हे सांगता येत नसतं. जगण्याची हमी देतं ते खरं स्वातंत्र्य! जगातील अनेक राष्ट्र गोऱ्यांच्या गोठ्यात बांधलेल्या जनावरांसारखी अद्यापि, पारतंत्र्यातच आहेत. पण दहशतवादाच्या विषारी सावलीत वावरणारे गोऱ्यांचे पाश्चात्त्य देशसुद्धा सामाजिक, धार्मिक, वैचारिक आणि मानसिक गुलामगिरीत ढकलले जात आहेत, हे वास्तव नजरेआड करता येत नाही. त्यांच्या स्वातंत्र्याला तरी अर्थ कोठे आहे?

राष्ट्राचे चैतन्य मूर्त तू असं स्वातंत्र्याचं वर्णन वि.दा.सावरकरांनी केलं आहे, तर 'भारतरत्न' डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, 'मानसिक स्वातंत्र्य हेच खरं स्वातंत्र्य आहे!' आनंद, उत्साह, उल्हास यांनी रसरसलेली माणसं ज्या देशात आहेत, तो खरा स्वतंत्र देश. आधुनिक समाजशास्त्रज्ञ राष्ट्राच्या उत्पादनापेक्षा त्या देशातील लोकांच्या 'आनंदीपणाच्या निर्देशांका'चा निर्देशांका'चा विचार करू लागले आहेत. देशवासीयांचा हा आनंद काही आकाशातून खाली पडत नाही, तर तो लोकांच्या शिस्तबद्ध, सुजाण, चोखंदळ, सहिष्णुता, सहनशीलता आणि उच्च नीतिमत्ता यांच्या पालनातून निर्माण होतो. म्हणूनच अशा देशात प्रशासन पारदर्शी असतं; आणि अर्थकारणही पारदर्शी असतं. प्रत्येक नागरिकाला विकासाच्या संधीही भरपूर उपलब्ध असतात आणि प्रत्येक नागरिक पर्यावरणाच्या उच्च पातळीला जीवापाड जपत असतो. मग अशा देशात आनंदी आनंदी गडे, जिकडे तिकडे चोहीकडे असा हर्ष तुडुंब भरून ओसंडणारच! असा देशच स्वातंत्र्य या शब्दाला अर्थपूर्ण बनवतो.

असा आनंद भारताच्या साठ वर्षे पार केलेल्या स्वातंत्र्याने किती देशवासीयांना दिला, हा प्रश्न मात्र चिंताग्रस्त करणारा नक्कीच आहे. जागतिक आरोग्य संघटनेने ३६ टक्के भारतीय खिन्नावस्थेत, उदासावस्थेत आपलं जीवन कंठत आहेत, असं म्हटलं आहे. व्यसनी, दुर्गुणी, गुन्हेगार, मनोरुग्ण ही उरलेली माणसंही दुःख, पश्चात्ताप, व्याधिग्रस्तता, आर्थिक चणचण यांनी पछाडलेली, पीडितच आहेत. भारताचा आदिवासी समाज कधी सरकारी माणसांच्या, तर कधी उग्र हिंसाचारी नक्षलवाद्यांच्या भीतीने सैरभैर मनोवस्थेत रात्रंदिवस जीव मुठीत धरून मरणाच्या दहशतीतच वावरतोय. जम्मू-काश्मीरचे निवासी गेली वीस वर्ष स्वदेशात निर्वासिताचं जीवन जगताहेत. राजस्थान, हरियाना, उत्तर प्रदेश आणि बिहारच्या खाप पंचायतींनी तरुण-तरुणी, शूद्रातिशूद्र, भूमिहीन किसान-मजूर आणि तमाम स्त्रीसमाजाचं जीवन मुष्कील करून सोडलं आहे. त्यामुळे ही माणसं व्यसनं वा छा-छूवाल्या मांत्रिकांच्या आश्रयाला जाऊन स्वतःचा नाश करून घेत आहेत. अशांच्या वाटणीला स्वातंत्र्यदिनाचा एक लक्षांश भाग तरी येत असेल का?

भारताच्या अदूरदर्शी नेतृत्वाने जागतिकीकरणाची घोरपड आपल्या गळ्यात बांधून घेऊन परिश्रमाधारित तंत्रज्ञान नाकारण्याची घोडचूक केली आहे. मग बेकारांच्या संख्येत आणि त्यांच्या वैफल्यात भर पडणारच! दहा तरुणांपैकी आठ तरुण रिकामे राहिले, तर देशभर सैतानांच्या वसाहती वाढणार! या वसाहतींनी देशाला वेढले जात आहेत, भारताचे उरलेसुरले आनंदी, स्वच्छंदी, चंगळवादी आमदार, खासदार, विशेषाधिकारभोगी नोकरशहा, क्रिकेटवीर, बिल्डर्स आणि लहान-मोठे सुखवस्तू भांडवलवाले आपलं अपहरण कधी होईल, खंडणीखोर गुंड कधी आपल्यामागे लागेल, या धास्तीमुळे त्यांच्याही आनंदाची पातळी रोज खालावत चालली आहे. या अशा अवस्थेत आनंद निर्देशकांची आणखी घसरण होऊन भारत हा अस्वस्थच नव्हे, तर अत्यवस्थ लोकांचा देश आहे, असं कुणी म्हटलं तर ते चुकीचं ठरणार नाही. कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री येडियुराप्पांनी शपथग्रहणप्रसंगानंतर 'कर्नाटक राज्यावर देवी-देवतांची अवकृपा होत आहे' म्हणून मंदिरांना एकशे तीस कोटींचं दान (सरकारी खजिन्यातून) जाहीर केलं आणि दिलं. देवतापूजन आणि नवग्रहशांतीमध्ये पैसा, डोके आणि शरीर कष्टवूनही हा भला मनुष्य आपल्या आध्यात्मिक शक्तीने आपलं पद टिकवू शकला नाही. कमी-अधिक प्रमाणात राजकारणात आणि समाजकारणात अशाच अधः पतित, विवेकहीन- विचारहीन आणि अवैज्ञानिक मानसिकतेच्या व्यक्तींचा भरणा नेहमी होत असेल, तर राष्ट्रीय चेतना आणि चैतन्य यांचे तीन तेरा वाजायला कितीसा वेळ लागणार? असं चैनत्यहीन स्वातंत्र्य म्हणजे पेंढा भरलेला वाघ, भाकड गाय किंवा बुजगावणंच ना? जनतेच्या सुखाचं साकडं पांडुरंगाला घालणारे महाराष्ट्राचे आजी-माजी नेते बिनडोक आहेत आणि नेतृत्वालाच कलंकित करताहेत. अशी देवधमार्ची गुलाम असलेली माणसं स्वातंत्र्य हा शब्द तरी उच्चारण्याच्या लायकीची आहेत का? स्वातंत्र्यदिनाची मानवंदना स्वीकारताना यांना लाज कशी वाटत नाही? त्यामुळे त्यांच्या कोडगेपणाला मयार्दा नाही, असं वाटतं. स्वातंत्र्याची ही सार्वत्रिक विटंबना नागरिकांनी सुजाण, समर्थ होऊन थांबवणं गरजेचं आहे. कारण वर्तमान सांगतंय-


कागदी नकाशा । स्वतंत्र जाहला
देश मात्र आहे। गुलामीत ॥ १
स्वातंत्र्याचे गाणे। जोरात वाजले
बुद्धीला लुटले । भावनेने ॥२
देवाची गुलामी । धमार्ची गुलामी
रूढींची गुलामी । अबाधित ॥ ३
या गुलामीने केले । शेण विज्ञानाचे
चित्र स्वातंत्र्याचे । नासविले ॥४
बुद्धीने स्वतंत्र । मनाने स्वतंत्र
तो खरा स्वतंत्र । असेचि ॥५
कशाही प्रकारे । गुलामी नसेल
तेव्हाच तळपेल । स्वतंत्रता ॥६



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# मी...... असे स्पष्ट करतो की, फेसबुक वर मुर्ख बनलो...

फेसबुकवर एक पोस्ट व्हायरल होत आहे मी नाव असे स्पष्ट करतो की माझा फोटो, वैयक्तिक माहिती वगैरे फेसबुक वापरणार नाही रात्री वेळ (अनेकांच्या प्रोफाइल वर) वेगवेगळा, ही बातमी टिव्हीवर प्रसारित करण्यात आली आणि स्वतः ची माहिती सुरक्षित राहण्यासाठी बहुतांश फेसबुक वापरणाऱ्या लोकांनी शिक्कामोर्तब केले आहे. हे बघून खरंच हसु आले आणि स्वतःला सुशिक्षित, हुशार, चतुर समजणारे लोकही स्वतः मेंदूचा वापर करत नाहीत हे बघून त्यांच्या बुद्धीची किवही आली. सदर लेख कोणालाही कमी लेखण्यासाठी अजिबात नाही. परंतु चुकिची फसवी आणि हास्यास्पद पोस्ट लोक सहज फॉरवर्ड करतात पण एखादी महत्वाची, एखाद्याला फायदा होईल, रोजगार, शैक्षणिक पोस्ट शेअर करायला लोकांना कमी पणा वाटतो. आणि बुद्धी तपासण्यासाठी तयार करण्यात आलेल्या पोस्ट फॉरवर्ड करून आपण मेंदूचा वापरच करत नाही हे स्वतः च सिद्ध करून देतो. तेव्हा त्या शिक्षणाचा, बुद्धीचा आणि हुशारीचा फायदा नेमका कोणाला हा महत्त्वाचा प्रश्न बाजूला राहतो. फेसबुक वर फिरणारी पोस्ट शंभर टक्के चुकिची आहे. ही चुकिची पोस्ट आहे हे सर्वांना कळते फक्त थोडा मेंदुचा वापर करावा लागतो. पोस्ट मधील एक एक मुद्दा समजून घेऊया. मुद्दा क्रमांक एक उद्या एक महत्वाचा दिवस आहे ज्यावर रात्री (वेळ) अधिकृत पणे शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. या वाक्याचा अर्थ तरी करतो कळतो. महत्त्वाचा दिवस म्हणजे नेमकं काय? शिक्कामोर्तब कशावर केला? कोणी केला? शिक्कामोर्तब झालेले कागदपत्रे कुठे आहेत? या प्रश्नांची उत्तरे कोणाकडे ही नाहीत. मुद्दा नंबर दोन ही बातमी टिव्हीवर प्रसारित करण्यात आली आहे. तर कोणत्या टीव्हीवर प्रसारित करण्यात आली? कोणत्या व्यक्तीने बघितली? उत्तर नाही. फेसबुक चे नवीन नियम लागु होतात जे तुमचे फोटो वापरण्याची परवानगी देतात. फेसबुक चे नवीन कोणते नियम तयार झाले याची यादी कोणाकडे आहे? उत्तर नाही. हा मॅसेज कॉपी करा आणि फेसबुक वर पेस्ट करा जो करणार नाही त्याची फोटो शेअर करायला परवानगी आहे असे समजले जाईल. मॅसेज कॉपी करून फेसबुकवर टाकायचा तेव्हा फोटो चा वापर होणार नाही हे खरे की खोटे नंतर बघु हे मॅसेजचे फॉरमॅट दिले कोणी? उत्तर नाही. गोपनियतेचे उल्लंघन केल्यास केल्यास कायदेशीर परिणाम होऊ शकतात.. गोपनियतेचे उल्लंघन कोण करणार? कायदेशीर परिणाम कसे होऊ शकतात? शिक्षण आरोग्य सरकारने मोफत द्यायला पाहिजे पण हे विकत घेणाऱ्या लोकांना खरंच किती कायदेशीर बाबी माहिती आहेत हा संशोधनाचा प्रश्न आहे. मी मेटाला परवानगी देत नाही असे लिहणाऱ्या लोकांच्या मेंदुची खरचं किव येते. कारण तुम्ही फेसबुकवर प्रोफाइल वर काहीही लिहले तरी काही फरक पडत नाही फक्त आपण बुद्धीने किती गरीब आहोत हेच सिद्ध होते. चला आपण गोपनियते बद्दल बोलुया. फेसबुकच नव्हे तर इतर कोणतेही अँप नवीन नोंदणी करताना आपल्या कडून परवानगी घेतली जाते. आपल्या हातात असलेला मोबाईल थोडाही सुरक्षित नाही. फोटो, व्हिडीओ, कॉन्टॅक्ट नंबर, लोकेशन सह इतर बऱ्याच बाबी वेगवेगळ्या अँपद्वारे वेगवेगळ्या लोकांकडे आहेत. म्हणुनच आपल्याला आपण फोनवर बोलतो ते, मोबाईल बघतो तेच वारंवार समोर येते, जागा बदलली की लोकेशन दाखवते हे याला गुपित म्हणायचे का? आपल्या मोबाईल मध्ये आपण बऱ्याच वेळा माहिती भरतो तर आपले नाव, मोबाईल नंबर, मेल आयडी, बऱ्याच लोकांचे बँक अकाऊंट नंबर आपोआपच येतात. याला गोपनीयता म्हणायचे का? आपल्याला कोणत्याही गोष्टीचे गांभीर्य कधी येणार? अशा पोस्ट द्वारे फक्त आपण आपल्या बुद्धीचा वापर करतो की नाही हे सायबर क्रिमिनल बघत असतात. आपण आपली गोपनीयता आणि बौद्धीक पातळी सार्वजनिक करतो म्हणून अनेक ऑनलाइन फसवणूकीचे प्रकरण वाढले आहेत. गोपनियतेच्या गोष्टी कोण करते तर बाहेर जाऊन चहा जरी पिला तर ते सोशल मिडीयाला शेअर करतात ती गोपनियता? फिरायला गेले तर प्रत्येक ठिकाणची फोटो शेअर करतात, बेडरूम मधील फोटो शेअर करणाऱ्यांनी गोपनियते बद्दल फेसबुक वर लिहणे म्हणजे खरचं बुद्धीची कसोटीच असते. चुकिच्या, हास्यास्पद ज्यातून आपणच आपली बुद्धी वापरत नाही असे मॅसेज फॉरवर्ड करताना स्वतः ची छाती फुगते पण खरचं एखादी प्रबोधनात्मक पोस्ट, एखादी रोजगार, शिक्षण, आरोग्य यासंदर्भात कोणातरी फायदा होणारी पोस्ट शेअर करतांना मात्र कमीपणा वाटतो. एखादी चांगली पोस्ट शेअर झाली तर कोणाचा तरी लाखों रुपयांचा फायदाच होईल म्हणून न पाठवणारे जळकुटे लोक फेक पोस्ट पाठवण्यात माहीर असतात. परंतु फेक पोस्ट फॉरवर्ड करून स्वतः स्वतः चे हसू करून घेतो हे याचे सुद्धा भान राहत नाही. मागे अशीच एक पोस्ट व्हाट्सएपच्या संदर्भात फिरत होती. अनेकांनी ती शेअर करून स्वतः ची छाती फुगवली पण स्वतः ची बौद्धिक पातळी सर्वांना दिसली. बऱ्याच वेळा महापुरुषांच्या नावाने पोस्ट येतात हा दोन नंबर तुम्ही मत देऊन एक नंबर वर आना अर्थात एक नंबर व तिन नंबर वर कोण असते हे यांना माहिती नसते आणि हे महापुरुषांना वोट देऊन नंबर देणारे महान विद्वान लोक येथे आहेत. यातून दुसरे काहीच सिद्ध होत नाही तर फक्त आपण सहज मुर्ख बनु शकतो आणि सारासार विचार करत नाही हेच सिद्ध होते. म्हणून शहानिशा करून, आपली बौद्धिक पातळीवर बघून पोस्ट शेअर झाल्या तर मानसाला किंमत राहते व फसवणूक होत नाही. नाहीतर स्वतःच्या च हाताने स्पष्ट करतो मी मुर्ख बनलो आहे..



**विनोद पंजाबराव सदावर्ते**
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबाः 9130979300

# सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी ' ऑपरेशन सिंदूर' आणि ' स्वदेशी' विषयी जनजागृती करावी - मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई,(कटूसत्य वृत्त):-** सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी यावर्षीच्या गणेशोत्सवामध्ये भारताने जगाला ऑपरेशन सिंदूरद्वारे दाखविलेली शक्ती आणि स्वदेशी वस्तूंच्या वापराविषयी जनजागृती करावी. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी प्रशासनासोबत समन्वय ठेवून हा गणेशोत्सव शांतता व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करीत ' ऑपरेशन सिंदूर' वर आधारित देखावे हे जवानांसाठी समर्पित असण्याची अपेक्षाही व्यक्त केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गणेशोत्सवा दरम्यान गणेश भक्तांना कुठल्याही प्रकारे अडचणी येणार नाहीत, त्यापद्धतीने कार्यवाही करण्याच्या सूचनाही प्रशासनाला दिल्या. सार्वजनिक गणेशोत्सव निमित्त कायदा व सुव्यवस्था बैठकीचे आयोजन सह्याद्री अतिथी गृह येथे करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री आढावा घेताना बोलत होते. बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम, मुख्य सचिव राजेश कुमार उपस्थित होते.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाप्रमाणे मूर्तीकारांनाही सलग पाच वर्ष परवानगी देण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री म्हणाले, मूतीकार्रानी या परवान्यांचे दरवर्षी नूतनीकरण करावे. परवानगीसाठी महापालिके मार्फत सुरू करण्यात आलेल्या संगणकीय प्रणालीवर आधारित एक खिडकी योजनेचा लाभ घेण्यात यावा. गणेश मूर्तीचे विसर्जन करण्यासाठी कृत्रिम तलावांची संख्या आणि उंच मूर्तीचे खोल समुद्रात विसर्जनासाठी बोटींची संख्याही समुद्रकिनारी वाढविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

मुख्यमंत्री म्हणाले, गणेशोत्सवाला राज्य शासनाने राज्य महोत्सवाचा दर्जा दिला आहे. त्यामुळे राज्य शासनातर्फे हा महोत्सव साजरा करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर विस्तृत नियोजन करण्यात आले आहे. गणेशोत्सव मंडळांना मागील वर्षी दिलेल्या सर्व सवलती याही वर्षी कायम ठेवण्यात येतील. हा उत्सव साजरा करताना कायद्याचे योग्य पालन करावे. ईद ए मिलाद सणही गणेशोत्सवा दरम्यान येत असल्याने समन्वयाने धार्मिक सौहार्दता ठेवत कुठेही कायदा सुव्यवस्था बिघडणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. गणेशोत्सवादरम्यान ध्वनिक्षेपकांना दिलेल्या परवानगीचे दिवस वाढविण्यासाठी न्यायालयाच्या अधीन राहून सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या कार्यालयांसाठी मालमत्ता कराची आकारणी करताना या कार्यालयांचा व्यावसायिक कारणासाठी उपयोग होत नसल्याबाबत मंडळांनी प्रशासनाला लेखी दिल्यास, अशा मंडळांच्या कार्यालयांवर मालमत्ता कराची आकारणी करण्यात येणार नाही, असा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

बैठकीस गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बाल सिंग चहल, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, प्रधान सचिव (विशेष) अनुपकुमार सिंग, बृहन्मुंबई मनपा आयुक्त भूषण गगराणी, सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीचे अध्यक्ष गणेश दहिबावकर आदींसह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, गणेशोत्सव समित्या आणि मूर्तिकार संघटनांचे अध्यक्ष उपस्थित होते, तर दूरदृष्टी प्रणाली द्वारे मनपा आयुक्त, पोलीस आयुक्त, जिल्हा पोलीस अधीक्षक यांची उपस्थिती होती. बैठकीत महापालिका अतिरिक्त आयुक्त अमित सैनी यांनी सादरीकरण केले.

वात्रटिका

## दुकान बंद आदेश

स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही
खाण्यावर बंदी आहे...
मुद्दा मिळाला काहींना
जणू त्यांना ही संधी आहे...
आदेश आहे स्वातंत्र्यदिनी
चिकन मटण दुकाने बंद ठेवा...
एक दिवस मांसाहार सोडून
दुसरे काही तरी खावा...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

# श्री गणपती फार्मसी मध्ये क्वालिटी अश्युरन्सवर वर्कशॉप संपन्न




**टेंभूर्णी (कटूसत्य वृत्त):-** श्री गणपती इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस अँड रिसर्च, टेंभुर्णी महाविद्यालयामध्ये "क्वालिटी अश्युरन्स इन फार्माः ब्रिजिंग अकॅडेमिया अँड इंडस्ट्री" या विषयावर वर्कशॉपचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी प्रमुख वक्ते म्हणून आशुतोष पंके सध्या असिस्टंट मॅनेजर , सिप्ला गोवा उपस्थित होते. मागील १० वषार्चा त्यांचा प्रदीर्घ अनुभव, क्वालिटी अश्युरन्स विभागाचे औषधनिर्माण कंपनीमध्ये असणारे महत्व, जबाबदाऱ्या आणि कर्तव्य यावर त्यांनी प्रकाश टाकला.

त्याचबरोबर औषधनिर्माण कंपनीमध्ये असणारे सर्व विभाग आणि त्यांचे कामकाज याबद्दलही माहिती विद्यार्थ्यांना दिली. सर्व बी. फार्म विद्यार्थी वर्कशॉपसाठी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नामदेव शिंदे यांनी केले तर आभारप्रदर्शन डॉ. प्रशांत मिसाळ यांनी केले.

यावेळी संस्था सचिव डॉ. रवींद्र बेंदगुडे, अध्यक्ष अँड विजयराव हिरवे, उपाध्यक्ष बाबा येडगे, प्राचार्या डॉ. रुपाली बेंदगुडे, ट्रेनिंग प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. नामदेव शिंदे, डॉ. सचिन सकट, डॉ. प्रशांत मिसाळ, प्रा. शिवराज ढगे, प्रा. शैलेश पेंडोर आदी शिक्षक उपस्थित होते.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# मेंदू मृत व्यक्तीचेच अवयवदान; नेत्रदान व देहांगदान मृत्यूनंतरच केला जातो - योगीन गुर्जर



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** देहदान, नेत्रदान व अवयवदान यामध्ये ढोबळ स्वरुपात तीन भाग आहेत. अवयवदान व देहदान - नेत्रदान यामध्ये फरक आहे. 'देहदान' हे नैसर्गिक मृत्यू झाल्यावरच केले जाते. सदरच्या व्यक्तीला कुठल्याही प्रकारच्या शस्त्रक्रिया केली नसावी. तसेच गंभीर स्वरुपाचे आजार किंवा कँसर वैगेरे असू नयेत. अशा व्यक्तीचेच देहदान संबंधित यंत्रणेकडून स्वीकारले जाते. त्याचबरोबर 'नेत्रदान'ही मृत्यूनंतरच डोळे संपूर्ण न काढता केवळ वीस मिनिटात विशिष्ठ प्रकारात काढून एका मृत व्यक्तीचे किमान चार गरजू व्यक्तींना नवीन तंत्रज्ञानाच्या सहाय्याने लावतात. यासंदर्भात तज्ञ डॉक्टर्स सोलापूरात मोजकेच आहेत. त्यापैकी डॉ. तन्वांगी जोग आहेत. 'अवयवदान' हे मेंदू मृत (ब्रेन डेथ) झालेल्या व्यक्तीचेच केला जातो. यासंदर्भात समाजामध्ये समज - गैरसमज आहेत. याची माहिती प्रत्येकांने घेऊन या संदर्भात चळवळ उभे करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन देहांगदान जीवनदान समाजसेवी संस्था व दधिची अवयवदान प्रचारक संघ या संस्थेचे सक्रीय कार्यकर्ते योगीन गुर्जर यांनी केले आहे.

१३ ऑगस्ट रोजी जागतिक अवयवदान दिन म्हणून साजरा करतात. याचे औचित्य साधून, सोलापूरातील श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन, पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय आणि पद्मशाली सखी संघमच्या वतीने आयोजित केलेल्या उपक्रमात जीवनदान देणा-या नातलगांचे सन्मान कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर जोग नेत्रपेढीच्या डॉ. तन्वांगी जोग, वाचनालयाचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, अरविंद चिनी, फाउंडेशनचे उपाध्यक्ष नागेश सरगम, सखी संघमच्या अध्यक्षा मेघा इट्टम यांची उपस्थिती होती. गुर्जर पुढे बोलताना म्हणाले, मेंदू मृत झाल्यास किंवा व्हेंटीलेटरवर असलेल्या व्यक्तीचेच अवयवदान करण्यात येत असल्याने मृत व्यक्तीचे इच्छा किंवा कुटूंबाचा निर्णय असल्यास रितसर पध्दतीने करण्यात येतो. यावेळी जोग नेत्रपेढीच्या डॉ. तन्वांगी जोग म्हणाल्या, पैशांने श्रीमंत असण्याची आवश्यकता नाही, फक्त मनाने श्रीमंती आणि दान देण्याचे भाव असणे फार महत्वाचे आहे. म्हणून नेत्रदान, अवयवदान व देहांगदान हे सध्याच्या परिस्थितीत काळाची गरज आहे. कुटुंबातील सदस्यांचे सत्काराचे कार्यक्रम हे स्तुत्य उपक्रम आहे. ज्या कुटूंबातील व्यक्तींचे नेत्रदान, अवयवदान आणि देहदान केले आहेत असे कुटूंब इतरांना प्रोत्साहीत करणारे आहेत. जोग नेत्रपेढीच्या डॉ. तन्वांगी जोग म्हणाल्या. कै. सतीश पलगंटी यांच्या मृत्युनंतर अवयवदान केलेल्या त्यांच्या पत्नी श्रीमती कल्पना पलगंटी, रामचंद्र अंजिखाने यांचे देहदान करण्यात आले होते. त्यांचे पुत्र ज्ञानेश्वर (देवा) अंजिखाने, पुष्पावती इप्पलपल्ली यांच्या मरणोत्तर नेत्रदान करण्यात आले. त्यांचे चिरंजीव प्रवीण जयप्रकाश इप्पलपल्ली आणि चेतन गुर्रम यांच्या मृत्युनंतर नेत्रदान करण्यात आले होते. त्यांचे बंधू लक्ष्मीनारायण गुर्रम अशाप्रकारे चौघांची सोलापूरी टॉवेल व गुलाब फूल देऊन सन्मान करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी वाचनालयाचे पदाधिकारी, कर्मचारी व फाउंडेशन व सखी संघमच्या पदाधिकारी यांनी विशेष सहकार्य मिळाले. प्रास्ताविक, स्वागत व सूत्रसंचालन सखी संघमच्या समन्वयिका कला चन्नापट्टण यांनी केले आहे तर, फाउंडेशनचे उपाध्यक्ष नागेश सरगम यांनी आभार प्रदर्शन केले. याप्रसंगी श्रीनिवास कामूर्ती, किशोर व्यंकटगिरी, वैकुंठम् जडल, श्रीनिवास पोटाबत्ती, वनिता सुरम, ममता तलकोकूल, गीता भूदत्त, पद्मा मेडपल्ली, पल्लवी संगा यांचेही विशेष सहकार्य मिळाले आहे.

# प्लॅस्टिक राष्ट्रध्वजाचा वापर व निर्मिती करु नये



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** केंद्र शासनाच्या गृहमंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रध्वजाकरिता प्लॅस्टिकच्या वापरास व निर्मितीस मनाई आहे. भारतीय राष्ट्रध्वज संहितेचे काटेकोर पालन करावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत प्लास्टीकचे राष्ट्रध्वज वापर व निर्मिती करण्यात येऊ नये असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

राष्ट्रध्वजाविषयीचे प्रेम, निष्ठा, अभिमान दर्शविण्याकरिता विद्यार्थी नागरिकांकडूनदेखील राष्ट्रध्वजाचा वापर करण्यात येतो. कार्यक्रमानंतर राष्ट्रध्वज विविध सार्वजनिक ठिकाणी टाकले जातात. त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान होतो. रस्त्यात इतरत्र विखुरलेले राष्ट्रध्वज बरेच दिवस नष्ट होत नाहीत. राष्ट्रप्रतिष्ठेच्या दृष्टीने ही बाब गंभीर आहे. राष्ट्रध्वजाचा अवमान करणे त्याची विटंबना होणे हे बोधचिन्हे नावे (अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम १९५० राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१ तसेच ध्वजसंहितेच्या तरतुदीनुसार दंडनीय अपराध आहे.

खराब झालेले, राष्ट्रध्वज आढळून आल्यास ते सन्मानपूर्वक गोळा करुन नजीकच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यालयामध्ये जमा करावेत. तसेच नागरिकांनी ध्वज संहितेच काटेकोर पालन करावे असे आवाहनही प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

# 'सद्भावना'तर्फे राष्ट्रीय एकता उपक्रम

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** येथील सद्भावना वंदे मातरम मंडळाच्यावतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून १३ ते २६ ऑगस्ट दरम्यान राष्ट्रीय एकता उपक्रम साजरा करण्यात येणार असल्याची माहिती मंडळाचे प्रमुख दिव्यकांत गांधी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यानिमित्त उद्या (बुधवारी) पासून नवीवेस पोलीस चौकी शेजारील गांधी ट्रॅक्टर दुकानाजवळ तसेच सद्भावना तिरंगा बंगला येथे तिरंगा झेंडे, तिरंगी वस्तू तसेच तिरंगा मिठाई मिळणार असून १५ ऑगस्ट रोजी सकाळी साडेअकरा वाजता मान्यवरांच्या हस्ते भारतमातेचे पूजन करण्यात येणार आहे. गेल्या ३४ वर्षापासून दरवषी हा उपक्रम राबविण्यात येत असून यामध्ये २० ऑगस्ट रोजी राष्ट्रीय उत्सवाप्रमाणे घरोघरी काम करणाऱ्या महिला, वाचमन, फेरीवाले, सामाजिक संस्था, अनाथ शाळांमधील विद्यार्थी आदी ठिकाणी लाडू वाटप करण्यात येणार आहेत. तर २६ ऑगस्ट रोजी विविध शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी भारतीयांचे आपले सण एक उत्सव दृश्य या विषयावर आधारित चित्रकला स्पर्धा घेण्यात येणार असून ही स्पर्धा पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी राहणार असल्याचे गांधी यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस नारायण छाब्रिया प्रकाश लगा, ध्रुवेश गांधी, रोशन शेख, सोना गांधी, श्रुती गांधी, स्नेहा गांधी आदी उपस्थित होते.



# बार्शी नगरपरिषद, बार्शी

## जि.सोलापूर

### विद्युत विभाग

जा.क्र.लाईट/४१६३ दिनांक- १३/०८/२०२५

## सर्वसाधारण मुदतीची निविदा नोटीस

शासनमान्य विद्युत ठेकेदार यांना कळविण्यात येते की, बार्शी नगरपरिषद खालील नमूद केलेल्या दोन कामांची मोहोर बंद लेखोटयामधुन निविदा मागवित आहे. सदर दोन्ही कामांची निविदा ही दोन लिफाफा पध्दतीने देणेची आहे. लिफाफा क्र. १ मध्ये तांत्रिक कागदपत्रे असावीत व लिफाफा क्र. २ मध्ये दरपत्रक असावे व दोन्ही लिफाफ्यावर लिफाफा क्रमांक नमूद करुन दोन्ही लिफाफे मोठया लिफाफ्यात मोहोर बंद करावेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजे मंजुर रक्कम | सुरक्षित ठेव | निविदा संचाची फि | बयाणा रक्कम | कामाची मुदत | टेंडर प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | शहरातील गाडेगांव रोड उजनी जलशुध्दीकरण केंद्र तळमजला मधील विद्युत फिटींग करणे. | ५,६३,३७२/- | ९% बिलातून | ५९०/- | ५,६४०/- | ३० दिवस | बाबनिहाय |
| २ | शहरातील गाडेगांव रोड उजनी जलशुध्दीकरण केंद्र पहिला मजला मधील विद्युत फिटींग करणे. | ८,४४,४९५/- | ९% बिलातून | ५९०/- | ८,४५०/- | ३० दिवस | बाबनिहाय |

वरील दोन्ही कामांकरीता कोरी निविदापत्रके दि. २८/०८/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यत विद्युत विभागाकडे विकत मिळतील. दि. २९/०८/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत भरलेली निविदापत्रके नगरपरिषद कार्यालयात स्विकारली जातील. बयाणा रक्कमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डी.डी.) / पावती जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय दरपत्रक विचारात घेतली जाणार नाही. या कामासाठी निविदाधारक पात्र असला पाहिजे.

कमी अथवा जादा दराची निविदा मंजुर करणे अथवा नामंजुर करणेचा अधिकार नगरपरिषदेने राखुन ठेवला आहे. त्याची कारणे दिली जाणार नाहीत. शक्य झाल्यास त्याचदिवशी हजर निविदाधारकासमोर अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधीसमोर बंद निविदा पाकिटे मुख्याधिकारी यांच्या कार्यालयात उघडली जातील. बंद लखोटयावर कामाचे नाव स्वतंत्रपणे लिहण्यात यावे.

सही/-
मुख्याधिकारी
बार्शी नगरपरिषद, बार्शी


# पंढरपूर विकास आराखडा अभ्यास समिती तयार करा

## जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीत कॉरिडॉर बाधित परिसरातील मठ, मंदिरांच्या विश्वस्तांची मागणी



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** शासन, वारकरी संप्रदाय व पंढरपूर नागरिक यांचा सर्वांच्या संमतीने विकास आराखडा तयार करण्यासाठी वारकरी संप्रदायाचे प्रतिनिधी, पंढरपूर क्षिण नागरिक प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी यांचा एक प्रतिनिधी अशी पंढरपूर विकास आराखडा अभ्यास समिती तयार करावी. या समितीच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर विकास आराखड्याच्या पुनःमांडणीचा प्रयत्न झाला तर सर्वांना समाधान होईल. पंढरपूर विकास करणे शक्य होईल. या समितीच्या द्वाराच या प्रश्नावर तोडगा निघू शकतो. यावर आपण सकारात्मक निर्णय घ्यावा, असे निवेदन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना वारकरी संप्रदायाचे प्रतिनिधी व तीर्थक्षेत्र बचाव समितीच्यावतीने देण्यात आले. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पंढरपूर येथे कॉरिडॉर संदर्भात बाधित परिसरातील मठ, मंदिरांच्या विश्वस्तांशी मंगळवार, १२ रोजी चर्चा केली. यावेळी बाधितांकडून पंढरपुर विकास जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना बैठकीनंतर निवेदन देताना राणा महाराज वासकर, कबीर महाराज, निलेश बडवे, गणेश लंके, दत्तात्रय कवठेकर, मदन महाराज हरिदास, गणेश बडवे महाराज, भागवत महाराज चवरे. आराखडा अभ्यास समिती तयार करावी. अशी मागणी करण्यात आली. वारकऱ्यांना सुखसुविधा देण्यासाठी राज्य शासनाने पंढरपूर येथे कॉरिडॉर (विकास आराखडा) प्रस्तावित केला आहे. वारकरी संप्रदायातील सर्वांनी मिळून एक चांगला भुवैकुंठ विकास आराखडा शासनास सादर केला होता, त्याचे काय झाले, याचे उत्तर शासनाकडून मिळाले नसल्याचे वारकरी प्रतिनिधींनी जिल्हाधिकारी यांना बैठकीत सांगितले. यावेळी राणा महाराज वासकर, कबीर महाराज, निलेश बडवे, गणेश लंके, दत्तात्रय कवठेकर, मदन महाराज हरिदास, गणेश बडवे महाराज, भागवत महाराज चवरे, सुधीर रानडे, कौस्तुभ गुंडेवार, महेश महाराज देहूकर आदी उपस्थित होते.

### प्रस्तावीत विकास आराखड्यात अनेक त्रुटी

प्रस्तावीत पंढरपूर विकास आराखड्यात अनेक त्रुटी असून, सदरचा प्रस्ताव वारकरी संप्रदायातील मान्यवरांनी केलेल्या सुचना डावलून केला जात आहे. तसेच वारकऱ्यांचे प्रश्न वेगळे आणि उत्तरे वेगळी असा दिसून येत आहे. यामध्ये अनावश्यक भुसंपादन देखील दाखवण्यात आले असल्याने स्थानिकांकडून याला विरोध होत आहे.

# मोहोळच्या विकासासाठी तत्पर : आ. कल्याणशेट्टी

## सावळेश्वर येथे साडेपाच कोटींच्या विविध विकासकामांचे उद्घाटन



**पोखरापूर : (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्याच्या किंवा गावच्या राजकारणात मला काही रस नाही, मी पक्षाचा आदेश मानणारा कार्यकर्ता आहे. मोहोळच्या विकासासाठी मी तत्पर आहे, असे आश्वासन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी सावळेश्वर येथे दिले. मोहोळ तालुक्यातील सावळेश्वर येथे साडे पाच कोटींच्या विविध विकासकामांचे उद्घाटन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी सावित्रीबाई फुले आणि लोकनेते बाबूराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी माजी आमदार राजन पाटील होते. या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस सोलापूर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य सज्जन पाटील, भाजपा तालुकाध्यक्ष सतीश काळे, रमेश माने, राष्ट्रवादीचे माजी तालुकाध्यक्ष प्रकाश चवरे, सभापती धनाजी गावडे, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस विकास वाघमारे, सरपंच सखाराम साठे आदी उपस्थित होते. संतोष पवार म्हणाले, राजकारणामध्ये काम करत असताना माजी आमदार पाटील यांनी आमची ताकद तुमच्याच मागे तालुक्याचा विकास होतो की नाही, या पेक्षा एखाद्याची कशी जिरवायची असेच राजकारण मोहोळ तालुक्यात सुरू झाले आहे. समीकरण काही बदलली तरी या तालुक्यात सहकार किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वेळी आमची ताकद तुमच्या मागे उभी करू, असे आश्वासन माजी आमदार राजन पाटील यांनी आ. सचिन कल्यानशेट्टी यांना दिले. अनेकांना मोठे केले. त्यांची माणसं पारख करण्याची कला शिकण्यासारखी आहे.

# एक लाख लाडक्या बहिणींची पडताळणी

## रेशन कार्डावरील दोनपेक्षा जास्त, कमी-जास्त वयाच्या बहिणी ठरणार अपात्र




**सोलापूर : (कटूसत्य वृत्त):-** एकाच रेशन कार्डावर दोनपेक्षा अधिक असलेल्या महिला तसेच २१ पेक्षा कमी वय आणि ६५ पेक्षा जास्त वय असलेल्या एक लाख चार हजार महिलांची अंगणवाडी सेविकांकडून पडताळणी सुरू आहे. त्या महि ला अपात्र ठरण्याची शक्यता आहे. राज्य शासनाकडून महिला व बालकल्याण विभागास एक लाख चार हजार महिलांच्या याद्या प्राप्त झाल्या आहेत. त्याची पडताळणी अंगणवाडी सेविकांकडून केले जात आहे. ही पडताळणी दहा दिवसांत पूर्ण होणार आहे. त्यानंतर अपात्र लाडक्या बहिणींची माहिती समोर येणार असल्याची माहिती महिला व बालकल्याण विभागाने दिली आहे. जिल्ह्यात ८७ हजार लाडक्या बहिणी या एकाच घरातील असून, एकाच रेशनकार्डावर दोन पेक्षा अधिक असल्याची माहिती समोर आली आहे. तर १७ हजार लाडक्या बहिणी २१ वर्षांपेक्षा कमी वय तर ६५ पेक्षा अधिक वय असलेल्या आहेत. त्यामुळे त्याची खातरजमा करण्यासाठी अंगणवाडी सेविकांकडून पडताळणी सुरू आहे.

- एकाच रेशन कार्डावर अनेक लाभार्थी - ८७ हजार
- २१ पेक्षा कमी वय, ६५ पेक्षा जास्त वय १७ हजार
- जिल्ह्यातून चार हजार सेविकांकडून पडताळणी
- एक लाख लाडक्या बहिणी अपात्र ठरण्याची शक्यता
- राज्य शासनाकडून महिला व बालकल्याण विभागास एक
- लाख चार हजार महिलांच्या याद्या प्राप्त

शासनाकडून आलेल्या यादीच्या आधारावर जिल्ह्यातील लाडक्या बहिणींची पडताळणी जिल्ह्यातील चार हजार अंगणवाडी सेविका करत आहेत. त्या पडताळणीमधून जी आकडेवारी समोर येईल, त्यानुसार शासनाकडून कारवाई करण्यात येईल. लाडक्या बहिणींना अपात्र करण्याचे अधिकार आमच्याकडे नाहीत.

**-प्रसाद मिरकले,** जिल्हा कार्यक्रम अधिकारी


## निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय

**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-

8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी


**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

9822964815
9421984815

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) गरजू व्यक्तीस मानपान न पाहता कोणाचीही मदत घेणे उचित असते या अर्थाची म्हण २) टेकडी (हिंदीत) ३) डक उलट लिहा ४) एक आडनाव ५) बाण, तीर ६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ७) तांदूळ, भात (इंग्रजीत) ९) आजच्या पूर्वीचा गेलेला दिवस ११) परदेस चित्रपटाती अभिनेत्री-*** चौधरी १३) हेराफेरी चित्रपटातील अभिनेता-*** रावल १४) पतीचा भाऊ १६) नाट्य, ड्रामा (मराठीत) १७) शर्ट (ग्रामीण भाषेत) १९) गायीला दिला जाणारा नियमित खुराक २०) नट उलट लिहा २३) बॉडीगार्ड चित्रपटातील अभिनेत्री २६) स्वराज्याची पहिली राजधानी असलेला गड २७) ठाणे लगतचा जिल्हा २९) वांग्यामध्ये मसाला भरून केलेले ३२) वास, गंध ३६) फळातील गोड द्रव ३८) सोळा गुणिले दोन ३९) एक म्हण-दाम करी ** ४१) मार्ग, वाट (हिंदीत) ४२) तीन दुणे ४३) एक (इंग्रजीत) ४४) बारा गुणिले पाच

**आडवे शब्द :** १) भारताचे केंद्रीय नेते-नितीन **** ४) लातूरचे आमदार-अमित **** ७) कोकणातील एक आमदार-नितेश ** ८) पुष्कळ, भरमसाठ ९) बांगड्या विक्रीचा व्यवसाय करणारा १०) तरचा जोडीदार ११) दुधावरील साय १२) स्वभावाने खाष्ट १३) छ. शिवराय या गडावर असताना सिध्दी जोहरने गडाला वेढा टाकला होता १५) कोंढाणा किल्ला घेणारा छ. शिवरायांचा शूर सरदार १८) कापड फाटताना होणारा आवाज २१) पाण्याची लहर २२) दहा वर्षांचा काळ २४) नऊ भागिले तीन २५) पाच आणि सहा मिळून होणारी संख्या २७) तापमान पाहण्यासाठी वापरतात तो धातूचा पातळ चकचकीत घटक २८) घोड्यावर बसल्यानंतर पाय ठेवण्यासाठी असलेली लोखंडी कडी ३०) मवाळच्या विरूध्दार्थी ३१) नाम उलट लिहा ३२) कथेतील पंख असलेली स्त्री ३३) गरम मसाल्यातील एक घटक ३४) घड्याळ (हिंदीत) ३५) नवे कोरे, नवीन कोऱ्या न वापरलेल्या नोटा या अर्थाने ३७) घराच्या पायाभरणीसाठी वापरतात ते दगड, मुरूम इ. मटेरियल ३९) याच्यापासून धागा बनतो ४०) रास उलट लिहा ४२) उन्हाळा (इंग्रजीत) ४३) एक म्हण-काखेत कळसा अन् गावाला *** ४५) अकरा गुणिले तीन ४६) मुलाची पत्नी, स्नुषा

## सुडोकु - 27

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 5 | 4 | | 7 | | | 2 | 6 |
| | | 2 | | 4 | 9 | 8 | | 1 |
| | | | 2 | 5 | 6 | | | |
| 4 | | 7 | 1 | 3 | | 6 | | 5 |
| | | | | | 8 | 7 | | |
| | 8 | 3 | | 6 | | | 1 | |
| 2 | | | 6 | 8 | 3 | | 9 | |
| 6 | | | | 1 | 5 | | 4 | |
| | | 1 | 4 | 2 | 7 | | | |

# सोलापुर-मुंबई-दिल्ली अशी थेट विमान सेवा सुरू करा - खा.मोहिते पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** नवी दिल्ली येथे केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री खा. मुरलीधर मोहोळ यांची खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी भेट घेतली. यावेळी त्यांनी सोलापूर-मुंबई-दिल्ली अशी थेट विमान सेवा सुरू करण्याची मागणी केली. या सेवेमुळे सोलापूर आणि परिसरातील नागरिकांना मुंबई आणि दिल्ली येथे प्रवास करणे सुलभ होईल, तसेच व्यापारी आणि व्यावसायिक संबंधांना चालना मिळेल म्हणून सांगितले.



यासोबतच, खासदार मोहिते-पाटील यांनी राज्यात ज्या ठिकाणी नवीन विमानसेवा सुरू करणार आहेत त्या ठिकाणाहून तातडीच्या कामानिमित्त जिल्हाधिकारी व जि.प. मुख्याधिकारी यांच्या सोबतच इतरही सरकारी कर्मचाऱ्यांना कामानिमित्त मुंबई मंत्रालयात जाण्यासाठी विमान प्रवासाची परवानगी आणि सवलत देण्याची मागणी केली. यामुळे कर्मचाऱ्यांचा वेळ वाचेल आणि कामकाजात गती येईल, असे सांगितले केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांनी या मागण्यांवर सकारात्मक विचार करून योग्य पावले उचलण्याचे आश्वासन दिले. या भेटीमुळे सोलापूरच्या कनेक्टिव्हिटी आणि विकासाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे.यावेळेस भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष संजय सिंह, महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष संदीप भोंडवे, हिंदकेसरी पै.योगेश दोडके उपस्थित होते.

# मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या पीक नुकसानीची जिल्हा प्रशासनाने घ्यावी दखल- सरपंच मनोज महाडीक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** या आठवडाभरात सुरू असलेल्या मुसळधार पावसाने जिल्ह्याच्या अनेक भागात धुमाकूळ घातला आहे. या पावसामुळे बक्षी हिप्परगेसह अनेक भागात सर्वत्र पुलावर पाणी आल्यामुळे या गावांचा शहराशी असलेला संपर्क तुटलेला आहे.



त्यातच शेतकऱ्यांनी परिश्रमानं जोपासलेल्या खरीप पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. जिल्हा प्रशासनाने या नुकसानीची दखल घेऊन शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यावा, अशी मागणी दक्षिण सोलापूर तालुक्यातील बक्षी हिप्परगे गावचे सरपंच मनोज महाडिक यांनी शासनाकडे केलीय.

गेल्या चार दिवसात दक्षिण सोलापूर तालुक्याच्या अनेक भागात मुसळधार पावसाने सर्वत्र झोडपून काढले आहे. या पावसामुळे नद्या- नाले तुडुंब भरून वाहत आहेत. रस्त्यावर आलेल्या पाण्यामुळे अनेक गावात नदी आणि ओढ्यांना पूर सदृश्य परिस्थिती आहे. नदी ओढ्यावर आलेल्या पुरामुळे बक्षी हिप्परगे ते सोलापूर जिल्ह्यातील वरळेगांव, वडजी वा मराठवाड्यातील सीमावर्ती भागातील खडकी धोत्री या मार्गाची वाहतूक खंडित झाली आहे. या दिवसात बक्षी हिप्परगे गावाचा सोलापूर शहराशी असलेला संपर्कही खंडित झाला आहे.

आठवडाभरात होत असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतात सर्वत्र पाणी थांबलं असून त्यामुळे खरिपातील तूर, उडीद, सोयाबीन, मुग यासह अन्य पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

शेतकरी दरवर्षी आपल्या काळ्या आईची ओटी भरण्याच्या भावनेने शेताची संपूर्ण मशागत करून खरिपाची पेरणी करतो, तो आपल्या दैनंदिन गरजांना फाटा तर देतोच, प्रसंगी आपल्या पोटाला चिमटा देऊन पीक वाढीसाठी तो दिवस रात्र परिश्रम करतो.

यंदा प्रारंभ पासूनच समाधानकारक पाऊस झाल्याने आज शिवारात डोलत असलेली पिके, शेतकऱ्याच्या हातात तोंडाशी आलेला घास या मुसळधार पावसामुळे मातीत मिसळला आहे.

जिल्हा प्रशासनाने शेतकऱ्यांच्या नुकसानीची दखल घेऊन शेतकऱ्यांना संकट काळात दिलासा देण्यासाठी सर्वतोपरी मदत करावी अशी अपेक्षा बक्षी हिप्परगे गावचे सरपंच मनोज महाडिक यांनी बुधवारी सकाळी व्यक्त केलीय.

# ..ईथे ओशाळला मृत्यू , माणुसकी मेली

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सध्या सोशल मिडीयामुळे जग जवळ आले आहे म्हणतात. सोशल मिडीयाच्या या आभासी जगात माणुसकीही आभासी झालेली आहे याचे ह्रदयविदारक चीत्र नागपूर-जबलपूर महामार्गावर दीसले. रक्षाबंधनासाठी गावाला जाताना अपघात झाला आणि पत्नी ग्यारसी अमित यादव (वय ३१) हिचा मृत्यू झाला. रस्त्यावर त्याला कुणीही मदत न केल्याने डोकं सुन्न झालेल्या पती अमित भुरा यादव (वय ३५) याने चक्क पत्नीचा मृतदेह मोटारसायकलवर मागे ठेवून परतीचा प्रवास सुरू केला. त्याच्या या ६५ कि.मी. प्रवासात त्याने चार पोलिस ठाण्यांच्या सीमा ओलांडल्या. महामार्ग वाहतूक पोलिसांनी त्याच्या दुचाकीचा पाठलाग करीत व्हिडीओ क्लिप तयार करून व्हायरल केली. त्याला रोडवर जाताना अनेकांनी बघितले. मात्र, त्याला धीर देत मदत करण्याची माणुसकी कुणीच का दाखवली नाही ?




अमित व ग्यारसी मूळचे करणपूर, जिल्हा सिवनी, मध्य प्रदेश येथील रहिवासी. अमित हा पत्नीसह कोराडी नजीकच्या लोणारा येथे भाड्याने राहतो व बांधकामाच्या सेंटिंगची कामे करून उदरनिर्वाह करतो. ते मोटारसायकलने करणपूरला जायला निघाले होते.

सुन्न डोक्याने व घाबरलेल्या अवस्थेत त्याने पत्नीचा मृतदेह चक्क दुचाकीवर मागे बांधला आणि करणपूरला जाण्याऐवजी लोणारा येथे परत यायला निघाला. सायंकाळी तो पत्नीचा मृतदेह घेऊन लोणारा येथे घरी पोहोचला.

या अडीच तासांच्या प्रवासात त्याने चार पोलिस ठाण्यांच्या सीमा, टोल प्लाझा, आरटीओ चेकपोस्ट, चार मोठी व किमान १५ छोटी गावे ओलांडली तरी कोणीही विचारपूस केली नाही. दोन महामार्गावर प्रवास करणाऱ्या अनेकांना तो दिसला. पण, कुणाच्या ह्रदयात माणुसकी जागी झाली नाही. नियंत्रण कक्षाने अमितच्या दुचाकीच्या क्रमांकावरून त्याचा पत्ता शोधला व कोराडी पोलिसांना सूचना दिली. सायंकाळी कोराडी पोलिस त्याच्या घरी पोहोचले, तेव्हा तो घरी पत्नीच्या मृतदेहाजवळ बसून होता. पोलिसांनी चौकशी करून मृतदेह उत्तरीय तपासणीला पाठविला.

नागपूर-जबलपूर राष्ट्रीय महामार्गावरील मोरफाट्याजवळ मागून आलेल्या ट्रकने कट मारल्याने दोघेही रस्त्यावर पडले. क्षणभर डोळ्यासमोर अंधारी आली होती. ग्यारसी ही ट्रकच्या बाजूने पडल्याने चाकाखाली आली आणि तिचा मृत्यू झाला. त्यावेळी जोरात पाऊस सुरू होता. तो रोडवरून जाणाऱ्यांना मदत मागत असताना कुणीही त्याच्याजवळ थांबले नाही किंवा पोलिसांना सूचना दिली नाही तेव्हा त्याने पत्नीचा मृतदेह दुचाकीला बांधला आणि वाटचाल सुरू केली. या घटनेवरून समाज कीती असंवेदनशील झाला आहे याचे दर्शन घडले. एकीकडे सोशल मिडीयावर माणुसकीच्या दर्शनाचे खोटे व्हीडीओ टाकून पैसे कमावले जात आहेत.खोटी सामाजीक सेवा दाखवली जाते मात्र या घटनेमुळे समाजाच्या असंवेदनशीलतेचा बुरखा फाटला असून अपघाती मृत्यू झालेल्या महिलेच्या पतीला मदत करण्याची माणुसकी समाज विसरत चालला असेल तर तांत्रीक प्रगतीच्या गप्पा ही तकलादू आहेत. अमीत यादव वर आज आलेली वेळ ऊद्या कोणावरही येऊ शकते याचा विसर यंत्रणेसह समाजालाही पडू नये.

# विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा 19 ते 21 ऑगस्ट दरम्यान दौरा

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र विधान मंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा दिनांक 19 ते 21 ऑगस्ट 2025 दरम्यान सोलापूर जिल्हा दौरा नियोजित आहे. तरी सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी त्यांच्या विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची अद्यावत माहिती तयार करून प्रशासनाला सादर करावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित महाराष्ट्र विधान मंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीच्या दौरा पूर्वतयारी आढावा बैठकीत पाटील मार्गदर्शन करत होते. यावेळी इतर मागास बहुजन विभागाचे सहाय्यक आयुक्त गणेश सोनटक्के, समाज कल्याणच्या सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका वीणा पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांच्यासह सर्व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी पाटील म्हणाले की, महाराष्ट्र विधान मंडळाच्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचे प्रमुख आमदार सुहास कांदे असून विधान परिषद व विधानसभेचे मान्यवर 14 आमदार समिती सदस्य आहेत. ही समिती दिनांक 19 ते 21 ऑगस्ट दरम्यान सकाळच्या सत्रात संबंधित विभागाच्या अधिकारी यांच्या बैठकी घेऊन दुपारच्या सत्रात स्थळांना भेटी देतील. त्याप्रमाणे सर्व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपल्या विभागाची परिपूर्ण माहिती तयार करावी तसेच स्थळ भेटीच्या वेळी संबंधित अधिकारी यांनी उपस्थित राहावे अशा सूचना त्यांनी दिल्या. यावेळी इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त गणेश सोनटक्के यांनी सर्व संबंधित विभागाने त्वरित अद्यावत माहिती उपलब्ध करून द्यावी असे सांगितले.

# कृषी औजारे व साहित्याची लॉटरी सोडत संपन्न

## पात्र लाभार्थ्यांनी वेळेत औजारे खरेदी करणेची दक्षता घेण्याचे आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये जिल्हा परिषदेच्या कृषि विभागामार्फत सन 2025-26 जिल्हा परिषद सेस योजने अंतर्गत जिल्हयातील शेतक-यांकरीता शेतीपुरक औजारे व साहित्य वाटपाकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचे अध्यक्षतेखाली लॉटरी सोडत संपन्न झाली. यावेळी त्यांनी पात्र लाभार्थ्यांनी वेळेत औजारे खरेदी करण्याचे आवाहन केले.



यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांचे उपस्थितीमध्ये लक्षांकानुसार लॉटरी (सोडत) जि. प. प्राथमिक शाळा नेहरूनगर, उत्तर सोलापूर या शाळेतील शाळकरी मुलांकडून लाभार्थ्यांची लॉटरी (सोडत) काढण्यात आली.

सोडतीत निवड झालेल्या लाभार्थी यांना या आर्थिक वर्षामध्ये विहित खरेदी प्रक्रिया पूर्ण केले नंतरच सदर योजनेचा लाभ थेट पद्धतीने देय राहणार आहे. सर्व सोडतीमध्ये पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांनी पंचायत समिती स्तरावर क्षेत्रीय यंत्रणेशी समन्वय साधुन वेळेत औजारे खरेदी करणेची दक्षता घेण्याचे आवाहन कृषि विकास अधिकारी हरिदास हावळे यांनी केले आहे.

यावेळी कृषि विभागाचे हरिदास हावळे, कृषी विकास अधिकारी राजाराम भोंग, गट विकास अधिकारी पंचायत समिती उत्तर सोलापूर, सागर बारवकर, जिल्हा कृषी अधिकारी भारत कदम, जिल्हा कृषी अधिकारी अजय वगरे, मोहिम अधिकारी महेश पाटील, सहाय्यक गट विकास अधिकारी, ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद सोलापूर, महा. प्रशासन अधिकारी सुर्यकांत मोहिते, राजश्री कांगरे, लता बनसोडे व जिल्हयातील शेतकरी लाभार्थी, तालुक्यातील कृषि अधिकारी, विस्तार अधिकारी, कृषि यांचे उपस्थिती होती. औजारासाठी तालुकानिहाय एकुण उदिष्ट 2459 असुन त्याकरीता 21441 इतके अर्ज प्राप्त झाले होते. मुख्य कार्यकारी अधिकारी व अति. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे उपस्थीतीमध्ये सुरवातीला उत्तर पंचायत समिती कडील लाभार्थ्यांची सोडत शाळकरी मुलांकडुन काढणेत आली.

प्राप्त अर्जाची छाननी तालुका पातळीवर करणेत येऊन पात्र लाभार्थ्यांचे अर्ज जिल्हा परिषदेकडे सादर करणेत आले होते. त्यामध्ये प्रामुख्याने पिकसंरक्षण औजारे/उपकरणे (श्री पिस्टनस्प्रे पंप, पॉवर स्प्रेपंप, नॅपसॅक बॅटरी ऑपरेटेड स्प्रेपंप, ब्रश कटर, सोलार इन्सेंक्ट ट्रॅप), ट्रॅक्टर चलित औजारे (रोटाव्हेटर, पल्टी नांगर, रोटरी टिलर/विडर, पेरणी यंत्र), कृषि सिंचनासाठी सुधारित औजारे साधने पुरविणे. ( 5 एच पी सबमर्सिबल विदयुत पंपसंच, डिझेल इंजिन) कृषि सिंचनासाठी सुधारित औजारे साधने पुरविणे (कडबाकुटटी, ताडपत्री, मधुमक्षीका पेटी (25%), स्लरी फिल्टर) सेंद्रीय शेती 50% मर्यादित अनुदानावर DBT तत्त्वावर लाभार्थ्यांची निवड करणेत आली. तसेच प्रतिक्षा यादी देखील तयार करणेत आली आहे.

# शेतकरी हितासाठी ऊसदरासंदर्भात सकारात्मक निर्णय घेणार : उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी केंद्र शासनाच्या निदेर्शानुसार एफआरपी (रास्त व किफायतशीर दर) प्रमाणे ऊसदर देण्याबाबत राज्य शासन लवकरच सकारात्मक निर्णय घेणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

आज मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली या विषयावर बैठक झाली. बैठकीला सहकार मंत्री बाबासाहेब पाटील (ऑनलाईन), सहकार विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, साखर आयुक्त सिद्धराम सालीमठ, साखर संघाचे व्यवस्थापकीय संचालक संजय खताळ तसेच आमदार व साखर संघाचे उपाध्यक्ष प्रकाश सोळंके उपस्थित होते.

केंद्र शासनाच्या निदेर्शाप्रमाणे एफआरपी दरानेच ऊसदर मिळावा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. राज्यातील साखर कारखान्यांनी ऊस खरेदी करताना कायद्याने ठरवून दिलेला किमान दर देणे बंधनकारक आहे. त्यामुळे केंद्राच्या सूचनांनुसार राज्यातील साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांना एफआरपी दर अदा करण्याचा निर्णय लवकरच घेतला जाणार आहे, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले.

# 'वीर परिवार सहायता योजना समिती अंतर्गत कायदेशीर विनामूल्य मदतीचे आवाहन'

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** "NALSA - वीर परिवार सहायता योजना २०२५" अंतर्गत सेवारत व निवृत्त सैनिकांच्या कुटुंबीयांना कायदेशीर मदत व जनजागृतीसाठी जिल्हास्तरीय समितीची स्थापना सोलापूर येथे करण्यात आली आहे. या समितीच्या माध्यमातून सैनिकांच्या कुटुंबांना विनामूल्य कायदेशीर सेवा उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे.जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर येथे आयोजित बैठकीत समितीची स्थापना करण्यात आली. यामध्ये श्री मल्हार शिंदे (सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण), मेजर मिलिंद देवदत्त तुंगार (निवृत्त), श्री शमशोद्दीन नदाफ (अधीक्षक, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण), पॅनल विधीज्ञ श्री लक्ष्मण पाटील आणि कार्यालयातील कर्मचारी सहभागी होते.जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर तुंगार यांनी सैनिकांच्या कुटुंबीयांना आवाहन केले की त्यांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. कौटुंबिक वाद, मालमत्ता विवाद, फसवणूक, वारसा हक्क, नागरी व फौजदारी प्रकरणांमध्ये कायदेशीर सल्ला व मदत विनामूल्य दिली जाणार आहे.

संपर्कासाठीः - पॅनल विधीज्ञ श्री लक्ष्मण पाटीलः ९४२३९६५५९८ / ९७६७२६६२९५ - NALSA हेल्पलाईन टोल फ्री क्रमांकः १५१०० ही योजना न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या पुढाकारातून साकारली गेली असून, देशभरातील सैनिक व अर्धसैनिक दलांच्या कुटुंबीयांना दिलासा देणारी ठरत आहे.

# हर घर तिरंगा' अभियानातर्गत तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** हर घर तिरंगा" अभियान अंतर्गत गुरुवार दि. 14 ऑगस्ट 2025 रोजी दुपारी 2.00 वाजता तालुक्यातील सर्व कार्यालयांचे विभागप्रमुख व कार्यालयीन कर्मचारी यांची तिरंगा बाईक रॅली आयोजित करण्यात आली असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली. सदर तिरंगा बाईक रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक चौफाळा - नाथ चौक - तांबडा मारुती - महाद्वार - कालिका माता मंदिर - काळा मारुती चौफाळा ते छत्रपती शिवाजी महाराज चौक पर्यंत काढण्यात येणार आहे. बाईक रॅलीस तालुक्यातील सर्व लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार असून, तालुक्यातील सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच नागरिकांनी बाईक व तिरंगा झेंडासह रॅलीत सहभागी व्हावे असे आवाहन तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

# शासकीय ध्वजारोहण समारंभाचे आयोजन

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या 78 व्या वर्धापनानिमित्त तहसिल कार्यालय, पंढरपूर येथे शुक्रवार दिनांक 15 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 9.05 वाजता ध्वजारोहणाचा शासकीय समारंभ होणार आहे. उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहणाचा समारंभ संपन्न होणार असून, या समारंभास मान्यवर नागरीक, स्वातंत्र्य सैनिक तसेच शासकीय-निमशासकीय कर्मचा-यांनी उपस्थित रहावे असे, आवाहन तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ४४९/२०२५ नि.६

**सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ञ सिनिअर डिव्हीजन मे कुंभार सो यांचे कोर्टात.**

१) अबुबकर शमशोद्दीन शेख
वयः ४३ वर्षे, धंदाः मजुरी,
रा. ५ टंकसाळ नगर, होटगी रोड, आसरा, सोलापूर.
२) मुर्तुज शमशोद्दीन शेख
वय-४६ वर्षे, धंदा- मजुरी,
रा. १०४अ, लोकमान्य नगर, मस्जिद, सोलापूर. }अर्जदार
३) रेहाना शकील अडते
वय - ४१ वर्षे, धंदा- घरकाम,
रा.७, एस.बी. कॉम्प्लेक्स, होटगी रोड, सोलापूर.
४) आयेशाबानो इस्माईल शेख
वय - ४९ वर्षे, धंदा- घरकाम,
रा.मस्जिद, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर.
**विरुध्द.** }सामनेवाला
कोणी नाही

ज्याअर्थी सदर अर्जात नमूद अर्जदार नं. १ ते ४ यांचे वडिल शमशुद्दीन साहेबलाल शेख हे दि.०७/११/२०१५ रोजी सोलापूर येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार यांची आई आशाबी शमशुद्दीन शेख दि.१७/०१/१९९२ रोजी सोलापूर येथे मयत झाले आहेत. त्यामुळे अर्जदार नं.१ ते ४ हे त्यांचे कायदेशीर वारसदार असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्जदारांनी हल्लीचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी सदर अर्जाकामी कोणाची काही हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द केलेपासून ३० दिवसांच्या आत अथवा नेमलेली ता.३०/०८/२०२५ /२०२५ रोजी स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून म्हणणे व हरकत दयावी. त्याप्रमाणे कोणचेही म्हणणे न आल्यास काहीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल. आज दि.१४/०८/२०२५ रोजी आमचे सही व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

**लिपिक** (शिक्का) **हुकूमावरुन सहा अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर,सोलापूर.**

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्र/अभिलेख/कावि/४३/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब, तथा दंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात**

अरविंद कटयाप्पा कांबळे, }अर्जदार
**विरुध्द**
ग्रामपंचयात कार्यालय कोरवली }सामनेवाला

ज्याअर्थी, यातील अर्जदार यांचे मयत आजोबा नामे मुकिंदा दाटू कांबळे, यांची मृत्युची तारीख २६/०६/२००० रोजी रा. मु. पो. कोरवली ता. मोहोळ, जि. सोलापूर, येथील राहत्या घरी निधन झालेले आहे. सदरचा अर्ज अर्जदार यांनी त्यांचे आजोबा नामे मुकिंदा दादू कांबळे, यांचा मयत दाखला मिळणेकामी कलम १३ (३) जन्म-मृत्यु नोंदणी १९६९ प्रमाणे या मे. कोर्टात दाखल केलेला आहे. सदर मयतास अर्जदार हे सदर मयताचे एकमेव वारस असून त्यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही नाही.

त्याअर्थी, सदर अर्जाचेकामी अर्जदार यांना त्यांच्या आईचा मृत्यु दाखला मिळणेकामी कोणाची काही हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आंत किंवा नेमलेली तारीख - १२/९/२०२५ रोजी स्वत: अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाचीही काही हरकत अथवा म्हणणे न आल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबधी दाखला देण्यात येईल. हे आज दि.१४ /८/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिद्धी केले असे.

**लिपिक** (शिक्का) **हुकूमावरुन मा. तहसिलदार सो मोहोळ**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ६७०/२०२५ नि.६

**सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ञ सिनिअर डिव्हीजन मे रेडकर सो यांचे न्यायालयात**

श्री. लिंगप्पा शिवानंद ऊर्फ शिवण्णा चिकलगी
वय- ४९ वर्षे, धंदा - मजूरी,
रा. २९१, किसान नगर, अक्कलकोट रोड,
सोलापूर }अर्जदार
**विरूध्द**
कोणी नाही }सामनेवाला

ज्याअर्थी वर नमूद कै. शिवण्णा भिमण्णा चिकलगी हे अर्जदार यांचे जनक पिता आहेत. दिनांक २३/०९/२०१३ रोजी शिवण्णा भिमण्णा चिकलगी मयत झाले. डि. सब डी. सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका नविन हद्द वाढमधील तालुका उत्तर सोलापूर, पैकी कसबे सोलापूर येथील सर्व्हे नं.१४७/१ यांसी नविन सर्व्हे नं.१४५/१ यापैकी किसान नगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित सोलापूर या नांवाने ओळखले जाणारे मधील प्लॉट नं.२९१ यांचे क्षेत्र पूर्वपश्चिम - २५ चौ.फुट व दक्षिणोत्तर ४० चौरस फुट असे एकूण - १००० चौरस फुट असा आहे यांचे नांवाने आहे. सदर सोलापूर महानगर पालिकेच्या मालमत्ता रजिस्टरमधून कै. शिवण्णा भिमण्णा चिकलगी यांचे नांव कमी करून अर्जदारांच्या नांवाची नोंद होणेकामी मे. कोर्टात वारस प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी कोणाची काही तक्रार/हरकत अथवा इतर काही म्हणणे असल्यास त्यांनी स्वत: अगर वकीलामार्फत या मे. कोर्टात दिनांक २५/०९/२०२५ रोजी अथवा नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांत आपले लेखी म्हणणे मांडावयाचे आहे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास कोणालाही म्हणणे मांडावयाचे नाही असे समजून मे. कोर्ट योग्य ते आदेश करील, यांची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली तारीख १४/०८/२०२५

**लिपिक** (शिक्का) **हुकूमावरुन सहा अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर,सोलापूर.**

## जाहीर प्रसिध्दीकरण

एस आर क्र: १२६/२०२४

**मोहोळ येथील में. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सो यांचे कोर्टात**

रोशन हुसेन मुजावर (लग्नानंतरचे नांव )
रोशन करीम मुजावर (लग्नापुर्वीचे नांव ) }अर्जदार
वय ८०. धंदा घरकाम,
रा. मु. वाघोली पो.. सोहाळे ता. मोहोळ
जि सोलापूर
**विरुध्द**
मा. ग्रामसेवक अधिकारी
ग्रामपंचायत कार्यालय, वाघोली, }सामनेवाला
ता.मोहोळ,जि.सोलापूर.

ज्याअर्थी यातील अर्जदार त्यांचा व अर्जदार याचा स्वता नामे रोशन करीम मुजावर यांचे जन्म दिनांक ०१/०१/१९४३ रोजी. मौजे वाघोली ता.मोहोळ जि सोलापूर येथे जन्म झालेला आहे. येथ घरी जन्म झालेला आहे अर्जदार यांनी त्यांच्या जन्माची नोंद सामनेवाला यांच्या कडे जन्माची नोंदणी कायदयाप्रमाणे होवून मिळणे करिता हल्लीचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाचे कामी कोणाची काही हरकत अथवा म्हणने असल्यास ही जाहीर प्रसिध्दकरण प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत किंवा नेमलेली ता.१२/०९ / २०२५ रोजी स्वतः अथवा व वकीलामार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास कोणाचीही हरकत नाही . असे समजुन या अर्जाची चौकशी होवून में. तहससिल कार्यालय कोर्ट पुढील योग्य त आदेश करतील आज दि.१४ माहे ०८/ २०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले असे.

**लिपिक** (शिक्का) **हुकूमावरुन मे प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी सो मोहोळ**

## जाहीर प्रसिध्दीकरण

कि.अर्ज नं. ५४/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब, यांचे कोर्टात**

श्री. खेल एकनाथ हेळकर,
वय- ५७ वर्षे,धंदा- गटई कामगार,
रा. डिकसळ, ता.मोहोळ,जि.सोलापूर. }अर्जदार
हल्ली रा. समर्थ नगर, रुम नं.८४, वैष्णवी देवी
मंदिर जवळ, घनसोली गांव,
नवी मुंबई. ४००७०१
**विरुध्द**
ग्रामपंचायत डिकसळ,
ता. मोहोळ,जि.सोलापूर. (अर्जाची . }सामनेवाला
नोटीस ग्रामसेवक, ग्रामपंचायत डिकसळ,
यांचेवर बजावविण्यात यावी.)

ज्याअर्थी यातील अर्जदार खेलु एकनाथ हेळकर यांचा जन्म ता. २४/१०/१९६८ रोजी डिकसळ, ता. मोहोळ येथे झालेला आहे. परंतु त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत डिकसळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर ग्रामपंचायत जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी वर नमुद अर्जदार खेलु एकनाथ हेळकर यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत डिकसळ यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याच्या आत अथवा दि २७ / ८ / २०२५ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारांना त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे अर्ज मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे ता. १४/८/२०२५

(शिक्का) **हुकूमावरुन तहसिलदार सो मोहोळ**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ५५८/२०२५ नि.६

**सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ञ सिनीयर डिव्हीजन मे रेडकर सो यांचे कोर्टात**

१) नरेंद्र मल्लय्या कंदीकटला
वयः ६५ वर्षे, धंदाः कामगार
२) अक्षय नरेंद्र कंदीकटला
वयः २९ वर्षे, धंदाः नोकरी
रा. एम-३२, महेश नगर, विडी घरकुल, सोलापूर
३) अंजनी नरेंद्र कंदीकटला (लग्नापूर्वीचे नाव) }अर्जदार
सौ. अंजनी रविराज सामलेटी (लग्नानंतरचे नाव)
वयः ३६ वर्षे, धंदाः घरकाम
रा. फ्लॅट नं.२५, राघवेंद्र प्लॉटीनम, पुंजाल
ग्राऊंड जवळ, भद्रावती पेठ, सोलापूर
४) अमृता नरेंद्र कंदीकटला (लग्नापूर्वीचे नाव)
सौ. अमृता राघवेंद्र ताटीपामूल (लग्नानंतरचे नाव)
वय - ३५ वर्षे, धंदा- घरकाम
रा. प्लॉट नं. ६५, प्रियदर्शनी नगर,विडी घरकुल,
हैद्राबाद रोड, सोलापूर,
**विरुध्द**
कोणीही नाही. }सामनेवाला

ज्याअर्थी यात कै. रुक्मिणी नरेंद्र कंदीकटला यांचे दि.०५/१२/२००१ रोजी युनिक हॉस्पिटल, सोलापूर येथे निधन झालेले आहे. अर्जदार क्र.१ हे कै. रुक्मिणी नरेंद्र कंदीकटला यांचे पती आहेत. अर्जदार नं.२ हा कै. रुक्मिणी नरेंद्र कंदीकटला यांचा मुलगा आहे. अर्जदार क्र.३ व ४ या कै. रुक्मिणी नरेंद्र कंदीकटला यांच्या मुली आहेत. कै. रुक्मिणी नरेंद्र कंदीकटला यांचे नावे खालील मिळकत आहे. मिळकतीचे वर्णन:- डि व सब डि सोलापूर पैकी शहर सोलापूर म.न.पा. हद्दीतील ता. उत्तर सोलापूर पैकी कसबे सोलापूर येथील सर्व्हे नं. १०४ यापैकी पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, सोलापूर उपविभाग, सोलापूर, जुळे सोलापूर भाग-२, हैद्राबाद रोड या नावाने ओळखले जाणारे महेश नगरातील प्लॉट नं. एम-३२ यासी क्षेत्र ६०० चौ.फुट. सदर मिळकतीचे सोलापूर महानगरपालिका मिळकत क्र.३२३९७९ असा आहे. सदर मिळकतीमध्ये लोडबेरींगचे १ हॉल, १ किचन, संडास बाथरुम असे बांधकाम असून सदर मिळकतीत चालु लाईट कनेक्शन आहे. वर नमुद मिळकतीबाबत अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम ३ प्रमाणे वारसदाखला मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी कै. रुक्मिणी नरेंद्र कंदीकटला यांना अर्जदार यांचे व्यतिरिक्त अन्य कोणी वारसदार असतील किंवा कोणाचीही हरकत, तक्रार असल्यास त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दीकरण झालेपासून ३० दिवसांच्या आत किंवा नेमलेली तारीख दि.०३/०९/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर राहून लेखी हरकत घ्यावी. अन्यथा कोणाचीही हरकत नाही असे समजण्यात येईल. अन्यथा पुढील योग्य तो आदेश पारित करण्यात येईल ची नोंद घ्यावी. हे जाहीर प्रसिध्दीकरण आमच्या सही व शिक्कयानिशी प्रसिध्द केले आहे.

ता:१४/८/२०२५

**लिपिक** (शिक्का) **हुकूमावरुन सहा अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर,सोलापूर.**

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्र/अभिलेख/कावि १२/२०२४

**अनगर येथील मा.अप्पर तहसिलदारसो,यांचे कोर्टात**

श्री. वैभव नागनाथ खरे,
वय - ४२ वर्षे, धंदा-मजुरी, }अर्जदार
रा. रोपळे, ता. पंढरपूर,
जि. सोलापूर.
**विरुध्द**
ग्रामपंचायत खंडाळी,
ता. मोहोळ, जि.सोलापूर }सामनेवाला
(अर्जाची नोटीस ग्रामसेवक खंडाळी,
ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी.)

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांची मावशी साधना महादेव शिंदे हिचा जन्म ता.०१/०५/१९७३ रोजी मौजे खंडाळी, ता.मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार यांनी सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदाराचा यांच्या मावशीचा जन्म दाखल्याची ता.२०/०९/२०२४ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे मे १९७३ चे अभिलेखात अर्जदार यांच्या मावशीचा जन्म नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात अर्जदाराच्या मावशीचा जन्माची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/ हरकत असल्यास दि.१२/०८/२०२५ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासून१५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता. १४/०८/२०२५

**लिपिक** (शिक्का) **हुकूमावरुन मे प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी सो मोहोळ**

## जाहीर प्रसिध्दीकरण

कि.अर्ज नं. ४६/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब, यांचे कोर्टात**

श्री. विनोद शिवाजी बंडगर,
वय- २६ वर्षे,धंदा- शिक्षण, }अर्जदार
रा. डिकसळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर.
**विरुध्द**
ग्रामपंचायत डिकसळ,
ता. मोहोळ, जि. सोलापूर (अर्जाची }सामनेवाला
नोटीस ग्रामसेवक, ग्रामपंचायत डिकसळ,
यांचेवर बजावविण्यात यावी.)

ज्याअर्थी यातील अर्जदार यांनी त्यांचे आजोबा कालीदास दगडु बंडगर, यांचा जन्म ता. १०/०६/१९३५ रोजी मौजे डिकसळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झालेला आहे. परंतु त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत डिकसळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर ग्रामपंचायत जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी वर नमुद अर्जदार यांचे आजोबा कालीदास दगडु बंडगर यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत डिकसळ यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याच्या आत अथवा दि. २७/८ /२०२५ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारांना त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे अर्ज मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे ता.१४/०८/२०२५

(शिक्का) **हुकूमावरुन तहसिलदार सो मोहोळ**

## जाहीर प्रसिध्दीकरण

एस आर क्र: १२५/२०२४

**मोहोळ येथील में. तहसिलदार सो यांचे कार्यालय न्यायालय**

करीम हुसेन मुजावर
वय ३८. धंदा- व्यापार }अर्जदार
रा.१४३, तेलंगी पाच्छा पेठ, जेलरोड, सोलापूर
**विरुध्द**
मा. ग्रामसेवक अधिकारी
ग्रामपंचायत कार्यालय, वाघोली, }सामनेवाला
ता.मोहोळ,जि.सोलापूर.

ज्याअर्थी यातील अर्जदार त्याचा व अर्जदार याचा स्वता नामे करीम हुसेन मुजावर याचा जन्म दिनांक १०/०१/१९८५ रोजी. मौजे वाघोली ता.मोहोळ जि सोलापूर. येथे जन्म झालेला आहे. येथ घरी जन्म झालेला आहे अर्जदार यांनी त्यांच्या जन्माची नोंद सांमनेवाला यांच्या कडे जन्माची नोंदणी कायदयाप्रमाणे होवून मिळणे करिता हल्लीचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाचे कामी कोणाची काही हरकत अथवा म्हणने असल्यास ही जाहीर प्रसिध्दकरण प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत किंवा नेमलेली ता. १२/९/ २०२५ रोजी स्वतः अथवा व वकीलामार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास कोणाचीही हरकत नाही . असे समजुन या अर्जाची चौकशी होवून में. तहससिल कार्यालय कोर्ट पुढील योग्य त आदेश करतील . आज दि.१४/०८/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले असे.

**लिपिक** (शिक्का) **हुकूमावरुन मे प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी सो मोहोळ**

## जाहीर प्रसिध्दीकरण

जन्म मृत्यू एस आर १९३/२०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब, यांचे कोर्टात**

श्री. सचिन आप्पा साबळे,
वय - ४२ वर्षे, धंदा- मजुरी, }अर्जदार
रा. डिकसळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर.
**विरुध्द**
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत डिकसळ }सामनेवाला
ता. मोहोळ, जि. सोलापूर.

ज्याअर्थी यातील अर्जदार यांचा जन्म हा दि.०५/०६/१९८३ रोजी अर्जदाराचे राहते घरी मौजे डिकसळ येथे झाला आहे. परंतु त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत डिकसळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर ग्रामपंचायत जन्माचे रजिस्टरला झालेली नाही. याकरीता जन्म व मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी वर नमुद अर्जदार सचिन आप्पा साबळे यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत डिकसळ यांच्या जन्माचे रजिस्टरला होण्याकरीता कोणाची कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याच्या आत समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारास त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे अर्ज मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी. प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे

ता १४/०८/ २०२५

(शिक्का) **हुकूमावरुन तहसिलदार सो मोहोळ**